❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २४० ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये
www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

# दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




## थोडक्यात...

### 'डीजे'च्या हुल्लडबाजीत भाविकाचा मृत्यू

**हिंगोली : दैनिक संध्या**

भक्तीच्या नावाखाली सुरू असलेल्या डीजेच्या जीवघेण्या स्पर्धेला आता निष्पाप भाविकांच्या जीवाची किंमत मोजावी लागली. औंढा नागनाथ येथे दर्शनासाठी गेलेल्या कावड यात्रेतील दोन ध्वनीक्षेपक चालकांमध्ये वाहन मागेपुढे घेण्यावरून सुरू झालेली चढाओढ एका १९ वर्षीय भाविकाच्या मृत्यूला कारणीभूत ठरली. डिग्रस कऱ्हाळे शिवारात २२ ऑगस्ट रोजी सायंकाळी घडलेल्या या घटनेत सोमनाथ रोहिदास भानावत (१९, रा. डव्हा, ता. मालेगाव, जि. वाशिम) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. श्रावण महिन्यानिमित्त वाशिम जिल्ह्यातून भाविक कावड यात्रेद्वारे औंढा नागनाथ येथे दर्शनासाठी आले होते. दर्शन आटोपून परतताना डिग्रस कऱ्हाळे परिसरात सायंकाळी सहाच्या सुमारास भाविक चहा-पाण्यासाठी थांबले होते. यावेळी डीजेच्या तालावर भाविक नाचत असतानाच दोन डीजे चालकांमध्ये वाहन पुढे-मागे घेण्यावरून स्पर्धा सुरू झाली. एका डीजे चालकाने निष्काळजीपणे वाहन पाठिमागे घेतल्याने दोन डीजे वाहनांच्या मध्ये सोमनाथ भानावत सापडले. गंभीर जखमी झालेल्या सोमनाथ यांना हिंगोलीतील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

### ठाकरेंची तिसरी पिढी बांधणीसाठी मैदानात

**छत्रपती संभाजीनगर : दैनिक संध्या**

जंतर - मंतरच्या आंदोलनानंतर सरकार विरोधाचा सूर तरुणाईमधून उमटू लागल्यानंतर महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे अध्यक्ष अमित ठाकरे आता महाविद्यालयीन तरुणांच्या भेटी घेत आहेत. दुसरीकडे युवासेना नेते आदित्य ठाकरेही सप्टेंबर महिन्यात मराठवाड्यात दौरा करणार आहेत. तर मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त म्हणजे १७ सप्टेंबर रोजी उद्धव ठाकरेही मराठवाड्यात येणार असल्याचे सांगण्यात येते. जंतरमंतरचा धडा घेऊन तरुणाई बरोबर जोडून घेण्यासाठी विरोधी पक्ष सरसावले असल्याचे दिसून येत आहे. जंतरमंतरवरील आंदोलन म्हणजे ' अराजकाचे व्याकरण ' असल्याची मांडणी रा. स्व. संघाकडून पहिल्या टप्प्यात करण्यात आली. पुढे या मुलांशी संवाद ठेवण्याची गरज असल्याचे लक्षात आले आणि आता सरसंघचालक मोहन भागवत यांनी नवा संवाद घडवून आणला. त्याचे परिणाम भाजपवरही झाले. भाजपचे नेते आता तरुणांच्या भेटीला निघाले आहेत. राहुल गांधी यांच्या पुणे येथील ' छात्रो की गुंज' कार्यक्रमानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसही मैदानात उतरले आहेत. या पार्श्वभूमीवर तरुणांचे संघटन बांधणी व्हावी आणि विरोधी पक्ष म्हणून ते आपल्याशी जोडले जावेत असे प्रयत्न केले जात आहेत. अमित ठाकरे यांनी तरुणाईशी संवाद साधण्यासाठी तीन महाविद्यालयात दौरा करणार आहेत. तर पुढील काळात मराठवाड्यातील प्रश्न हाती घेऊन पुन्हा आंदोलन उभे राहू शकते का, याची चाचपणी शिवसेनेच्या ठाकरे गटाकडूनही सुरू करण्यात आली आहे.

### १ लाख ३१ हजार ५९६ नावे वगळणार?

**रत्नागिरी : दैनिक संध्या**

विशेष सखोल पुनरीक्षण (एसएसआयआर) उपक्रमांतर्गत रत्नागिरी जिल्ह्यातील मतदारांचे डिजिटायझेशन पूर्ण झाले आहे. अर्जाची पडताळणी केल्यानंतर तब्बल १ लाख ३१ हजार ५९६ मतदारांनी अर्ज बीएलओकडे जमा न केल्याने त्यांची नावे मतदार यादीतून वगळण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यामध्ये सर्वाधिक ४३ हजार ५६९ नावे रत्नागिरी विधानसभा मतदारसंघातील आहेत.



# कर्जमुक्ती योजनेचा दुसरा हप्ता जारी

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ₹५,०८६ कोटी वितरीत

**आतापर्यंत १२,५८,२४३ शेतकऱ्यांना ₹१०,११५ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ**

■ मुंबई (दै. संध्या)

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील ६,३६,०३६ पात्र शेतकऱ्यांना ₹५,०८६ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थेट ऑनलाइन पद्धतीने वितरित करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, या योजनेच्या अंमलबजावणीअंतर्गत आतापर्यंत १२,५८,२४३ शेतकऱ्यांना एकूण ₹१०,११५ कोटींच्या कर्जमुक्तीचा लाभ देण्यात आला आहे. पात्र शेतकऱ्यांना लाभ वितरणाची प्रक्रिया सुरू असून, लाभार्थींची संख्या सातत्याने अद्ययावत होत आहे.आतापर्यंत १३.७० लाख कर्जखात्यांचे आधार प्रमाणीकरण पूर्ण झाले आहे. सह्याद्री अतिथीगृह येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते योजनेच्या दुसऱ्या टप्प्यातील लाभ वितरण ऑनलाइन करण्यात आले.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, मंत्रिमंडळातील सदस्य, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव लोकेश चंद्रा, मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी आणि सहकार विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे उपस्थित होते.

# मराठे जिंकतील किंवा उपोषण करुन मरेन

## मनोज जरांगे-पाटील यांचा इशारा



■ छत्रपती संभाजीनगर (दै. संध्या)

मागण्या मान्य केल्या तर ठीक अन्यथा सरकारची मस्ती उतरवू. तीन वर्षापासून नुसते आश्वासन देत आहेत. २८ ऑगस्टपर्यंत सगळ्या मागण्यांची अंमलबजावणी करावी, सरकारने गैरसमजातून बाहेर यावे. या लढ्यात मराठे जिंकतील किंवा मी उपोषण करुन मरेन, असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी दिला आहे. जरांगे म्हणाले, 'तुम्हाला अजून मराठा समाजाकडून अपेक्षित काय आहे. ५८ लाख नोंदी देणे सरकारचं कर्तव्य आहे.आम्ही मराठ्यांना वेड्यात काढतो हा सरकारचा गैरसमज आहे.

शिष्टमंडळ आणि सरकारने गैरसमजातून बाहेर पडावे आता आम्ही वेळ देण्याच्या मनस्थितीत नाही. येणारे शिष्टमंडळ काय चर्चा करणार आहे. त्यांना मराठ्यांचा रोष कमी करायचा आहे काय, असेही जरांगे म्हणाले. हाके हे पोळी भाजण्यासाठी नेत्यांच्या दारात फिरतात. ओबीसीना ते मान्य नाही, अशी टीकाही जरांगे यांनी केली. माझे ओबीसी नेत्यांना आव्हान आहे मराठ्यांच्या विरोधात जाऊ नका.मराठ्यांच्या नादाला लागून तुमचं राजकीय करीअर उद्ध्वस्त करू नका.तुम्ही मंत्री आमदार झाल्यानंतर मराठयांच्या विरोधात काम करता. तुम्ही मराठा कुणबीच्या नादाला लागू नका असा इशारा जरांगे यांनी दिला. २९ ऑगस्टचे आंदोलन अंतरवलीमध्ये केले जाईल पण सरकारने डाव टाकला तर मुंबईत वर्षा आपल्या सगळ्यांची आहे. फडणवीस विरोध करणार नाहीत. त्यांना खोलीत अडचण होत असतील तर स्लॅब वर बसून आंदोलन करू, असेही जरांगे म्हणाले. समाज मला उघडा पडू देणार नाही. जोपर्यंत आंदोलन सुरू आहे तोपर्यंत मराठे येतील, असेही जरांगे म्हणाले.

# प्रेमाची वेगळीच गोष्ट : पिंपरीतील महिला पोलीस एकमेकींशी करणार लग्न

**भारतात समलिंगी विवाहांना मान्यता नाही**

■ पुणे (दै. संध्या)

एकाच पोलीस ठाण्यात काम करणाऱ्या दोन महिला पोलीस कॉन्स्टेबल्सनी लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे. या दोन्ही महिला कॉन्स्टेबल पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड येथील आहेत. ३० ऑगस्टला आळंदी या ठिकाणी या दोघीही लग्न करणार आहेत. या दोन्ही महिला कॉन्स्टेबल्सनी लग्नाच्या रजेसाठी अर्ज दिला आहे. या ठिकाणी वैदिक पद्धतीने दोघी लग्न करणार आहेत अशी माहिती समोर आली आहे. या लग्नाची चर्चा सोशल मीडियावरही रंगली आहे. तसंच यामुळे पुन्हा एकदा समलिंगी विवाहाचा मुद्दा हा चर्चेत आला आहे.



समोर आलेल्या माहितीनुसार पिंपरीतल्या दोन महिला कॉन्स्टेबल्सनी एकमेकींशी वैदिक पद्धतीने लग्न करण्याचा निर्णय घेतला आहे. या दोघींपैकी एकीने लिंगबदल शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला आहे. या महिलेने असं म्हटलं आहे की ही प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आमच्या विवाहाला कायदेशीर मान्यता मिळेल अशी अपेक्षा आहे. आपल्या देशात दोन प्रौढ व्यक्तींमध्ये समलिंगी संबंध असणं हा गुन्हा नाही. मात्र हेदेखील वास्तव आहे की समलिंगी विवाहांना आपल्या देशात कायदेशीर मान्यता नाही. त्यामुळे या लग्नाबाबतची चर्चा सगळीकडेच रंगली आहे. ऑक्टोबर २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने नॉन हेटरोसेक्शुअल जोडप्यांसाठी विवाहाचा कायदेशीर हक्क मान्य करण्यास नकार दिला आहे. अशा पद्धतीचे विवाह म्हणजेच समलिंगी विवाह आणि त्यासंबंधीचा कायदा करायचा असेल तर ते काम संसदेच्या अधिकार क्षेत्रात येतं. संसदेत अशा प्रकारचा कुठलाही कायदा मंजूर झालेला नाही. त्यामुळे भारतात समलिंगी विवाहांना मान्यता नाही. ही पार्श्वभूमी लक्षात घेतली तर सदर महिला कॉन्स्टेबल्सना विवाह नोंदणी, लिंग ओळख आणि अधिकृत मान्यतेसाठी लागणाऱ्या कायदेशीर प्रक्रियांमध्ये अडचणी येऊ शकतात.

# कॉक्रोच जनता पार्टीचा दिल्लीत ५ सप्टेंबरला शांतता मोर्चा

**आंदोलकांवरचे गुन्हे मागे घेतले नसल्याने निर्णय**

■ मुंबई (दै. संध्या)

द कॉक्रोच जनता पार्टी अर्थात CJP ने येत्या ५ सप्टेंबरला दिल्लीत शांतता मोर्चा काढण्याची घोषणा केली आहे. तसंच देशभरात शांतता मोर्चा काढण्याचं आवाहनही तरुणाईला केलं आहे. दिल्लीत येत्या ५ सप्टेंबरला शांतता मोर्चा काढण्यात येईल. जुलै महिन्यात जे आंदोलन मागे घेण्यात आलं त्यातली एक अट सरकारने अद्याप पूर्ण केलेली नाही. त्यामुळे CJP ने हा निर्णय जाहीर केला आहे. सगळ्या आंदोलकांवरचे गुन्हे मागे घेतले जातील ही देखील अट सरकारने मान्य केली होती. पण अद्याप हे गुन्हे मागे घेण्यात आलेले नाहीत. त्यामुळेच दिल्लीत आता शांतात मोर्चा काढला जाईल असं CJP ने जाहीर केलं आहे.

कॉक्रोच जनता पार्टीने हे म्हटलं आहे की येत्या ५ सप्टेंबरला आम्ही दिल्लीत शांतता मोर्चा काढणार आहोत. अशा शांतता आंदोलनाचं देशभरात आयोजन केलं जावं असंही आवाहन त्यांनी केलं आहे. केंद्र सरकारने २५ जुलैला जी आश्वासनं दिली होती त्यानंतर आम्ही आमचं जंतर-मंतरवरचं आंदोलन मागे घेतलं होतं. मात्र अजूनही आंदोलकांवरचे गुन्हे मागे घेण्यात आलेले नाहीत. त्यामुळे आम्ही येत्या ५ सप्टेंबरला शांतता मोर्चाचं आयोजन केलं आहे. इंडिया गेट या ठिकाणाहून हे आंदोलन सुरु होईल. नवी दिल्लीच्या पोलीस मुख्यालयापर्यंत आमचा मोर्चा असेल असं CJP ने




स्पष्ट केलं आहे. नीट परीक्षा देणारे विद्यार्थी, नीट परीक्षा रद्द झाल्याने आत्महत्या केलेल्या मुलांचे आई वडील, २० जुलैला ज्यांनी ज्यांनी पोलिसांच्या लाठ्या खाल्ल्या ते सगळेजण या शांतता मोर्चात सहभागी होणार आहेत असंही CJP ने स्पष्ट केलं आहे. नीटच्या पेपरफुटीनंतर विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरु झालं होतं. CJP अर्थात कॉक्रोच जनता पार्टीचे संस्थापक अध्यक्ष अभिजीत दिपके आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांच्या नेतृत्वात हे आंदोलन सुरु होतं. धर्मेंद्र प्रधान यांनी नीट पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा दिला पाहिजे अशी प्रमुख मागणी होती. २० जुलैला या विद्यार्थ्यांनी संसद मार्चही काढला होता. ज्यावर लाठीचार्ज करण्यात आला.

यानंतर २५ जुलैला आंदोलक विद्यार्थ्यांवरचे गुन्हे मागे घेतले जातील ही मागणीही मान्य करण्यात आली होती. तसंच धर्मेंद्र प्रधान यांनी राजीनामा दिल्याने या आंदोलनाला मोठं यश मिळालं होतं त्यामुळे हे आंदोलन मागे घेण्यात आलं. आता अजूनही गुन्हे मागे घेण्यात आलेले नाहीत त्यामुळे CJP ने शांतता मोर्चा काढणार असल्याची घोषणा केली आहे.

# सुट्या तेल विक्रीवरील बंदीचे मंत्रिमंडळात तीव्र पडसाद

## *बंदीऐवजी मार्गदर्शक तत्त्वे लागू करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश*

■ मुंबई (दै. संध्या)

अन्न व औषध प्रशासन आयुक्तांनी राज्यात सुटे खाद्यतेल विक्रीवर पूर्णपणे घातलेल्या बंदीचे तीव्र पडसाद सोमवारी राज्यमंत्रिमंळाच्या बैठकीत उमटले. आयुक्त तुकाराम मुंढे यांचा हा निर्णय तेल उत्पादक आणि छोट्या व्यापाऱ्यांवर तसेच ग्रामीण भागातील गरजेनुसार सुटे तेल घेणाऱ्या गरीबांवरही अन्याय करणारा असल्याचा आरोप काही मंत्र्यांनी केला. त्यावर लोकांना चांगल्या प्रतीचे तेल मिळावे तसेच लोकांचा व्यवसायही चालू रहावा याद्दष्टीने सुट्या तेलाच्या विक्रीवर सरसकट बंदी न घातला त्यासाठी विशेष मार्गदर्शक तत्वे(एसओपी) लागू करण्याचे आदेश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अन्न व औषध प्रशासन आयुक्तांना दिले.

खाद्यपदार्थांमधील भेसळ रोखण्यासाठी अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर व्यापक मोहीम सुरू केली आहे. त्यानुसार खाद्यतेलातील भेसळ रोखण्यासाठी आणि नागरिकांच्या आरोग्यासाठी मुंढे यांनी सुट्या तेलाच्या विक्रीवर बंदी घातली आहे. या नियमांचे उल्लंघन केल्यास १० लाख रुपयांपर्यंत दंड आणि मानवी आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाल्यास ७ वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची तरतूद करण्यात आली आहे. मुंढे यांच्या या निर्णयाचे राज्यभर तीव्र पडसाद उमटले आहेत. या निर्णयामुळे तेल विक्री ठप्प झाल्याची तक्रार किरकोळ किराणा दुकानदारांनी केली आहे. तर व्यापारी संघटनांनी





या निर्णयाला विरोध करत तो मागे घेण्यासाठी किंवा मुदतवाढ देण्यासाठी मुख्यमंत्र्यांना साकडे घातले आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी या निर्णयास विरोध करीत मंत्रिमंडळ बैठकीत मुख्यमंत्र्याचे लक्ष्य वेधण्याची घोषणा केली होती.

त्यानुसार मंत्रिमंडळ बैठकीत शिरसाट यांनी सुटे तेल विक्रीवरील बंदीचा मुद्दा उपस्थित करताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह अन्य मंत्र्यांनी ही बंदी मागे घेण्याची मागणी केली. अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे भेसळ रोखण्यासाठी चांगली कारवाई करीत आहेत. सुटे तेल विक्रीवरील बंदीचा निर्णय लोकांच्या आरोग्याच्याद्दष्टीने घेण्यात आला असला तरी या निर्णयामुळे छोटे, दुकानदार, किरकोळ व्यापारी अडचणीत आले आहेत. तसेच ग्रामीण भागातील, झोपडपट्टीत राहणारे आणि हातावर पोट असणारे मजूर रोजच्या गरजेनुसार १० ते २० रुपयांचे सुटे तेल विकत घेतात. एकदम १ लीटर किंवा मोठ्या पॅकिंगचे तेल खरेदी करण्याची त्यांची आर्थिक क्षमता नसते. तसेच बाजारपेठेत ब्रँडेड कंपन्यांचे २५० ग्रॅम किंवा १०० ग्रॅमचे छोटे सीलबंद पॅकेट्स मोठ्या प्रमाणावर उपलब्ध नसतात. त्यामुळे सुटे तेल बंद झाल्याने गरिबांवर अन्याय असून हा व्यवसाय करणारेही अडचणीत आले आहेत अशा तक्रारी सदस्यांनी केल्या. लोकांना चांगल्या प्रतीचे शुद्ध तेल मिळावे आणि लोकांचा व्यवसायही सुरु रहावा असा मध्यम मार्ग काढण्याची मागणी मंत्रिमंडळात अनेक सदस्यांनी केली. तुकाराम मुंढे यांच्या मनमानीवर मंत्र्यांनी आक्षेप घेतला. त्याची दखल घेत सरसकट बंदी न घालता मध्यम मार्ग काढण्याबाबत आश्वस्त करीत फडणवीस यांनी या विषयावर पडदा टाकला.

> सुटे तेल विक्रीवरील बंदीबाबत आज मंत्रिमंडळात चर्चा झाली. मंत्र्यांनी अन्न व औषध प्रशासनाच्या कारवाईचे समर्थन केले. मात्र पारंपारिक पद्धतीने तेलाचा व्यापार करणाऱ्यांवर अन्याय होऊ नये आणि सुटे तेल घेणाऱ्या गरीबांवरही अन्याय होऊ नये असा मार्ग काढण्याची मागणी मंत्र्यांनी केली. यानुसार तेलाची गुणवत्ता सांभाळतानाच पारंपारिक व्यवसायही टिकला पाहिजे यासाठी मध्यम मार्ग काढून एसओपी काढण्याचे आदेश अन्न व औषध प्रशासन आयुक्तांना दिले जातील.
>
> **– देवेंद्र फडणवीस , मुख्यमंत्री**

# कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा इशारा

■ अहिल्यानगर (दै. संध्या)

महाराष्ट्रातील दुय्यम न्यायालयांमधील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाने मंजूर करून ३१ जानेवारी २०२५ रोजी राज्य शासनाकडे पाठविला. मात्र, या प्रस्तावावर शासनाकडून अद्याप निर्णय न घेतल्याने न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी 'समान काम समान वेतना'च्या मागणीसाठी बेमुदत संपाचा इशारा दिला आहे. या पार्श्वभूमीवर अहमदनगर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघटनेची बैठक घेण्यात आली. राज्य न्यायालयीन कर्मचारी गट-क संघटना, लघुलेखक, बेलीफ महासंघ तसेच चतुर्थ श्रेणी महासंघ या संघटनेच्या एकत्रित बैठकीत आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात आली. संघटनेचे अध्यक्ष अंकुश सांगळे, कार्याध्यक्ष शिरीष ढाळे, सचिव आनंद सोनपसारे, रवींद्र सूर्यपुजारी, आर. एन. गुंडू, आस्लम सय्यद, अजिनाथ पाडळकर, अतुल खरपुडे, बंडू बडे, सविता भालेराव, आर. डी. बेल्हेकर, डी. एस. परदेशी, अनिल निमसे, म्हाळसाकांत लिपाने, एस. एस. भालेराव, एस. एल. क्षिरसागर, वंदना केदार, अर्चना झिंजे, एस. एस. वाघ, व्ही. एच. खरात, सागर गायकवाड, प्रशांत खराडे, सुजित सानप, शिवाजी चांडोळे, अशोक जंगले, श्याम काठे, अमर तिवारी, ए. बी. मरकड, सुनील भावड आदीं उपस्थित होते. यावेळी अध्यक्ष अंकुश सांगळे म्हणाले की, न्यायव्यवस्थेचा कणा म्हणून दुय्यम न्यायालयीन कर्मचारी आपले कर्तव्य बजावत आहेत. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणेच दुय्यम न्यायालयातील कर्मचाऱ्यांनाही वेतन मिळावे, याचा प्रस्ताव उच्च न्यायालयाने मंजूर करून शासनाकडे पाठविला. मात्र हा प्रस्ताव अद्याप मंत्रालयात प्रलंबित आहे.

# संपादकीय

## कमांडर-इन-चीफ

इराणी सेनेचे कमांडर-इन-चीफ अमीर हातमी यांनी तेहरानमध्ये या योजनेची घोषणा केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक मागण्या आल्यानंतर ही योजना तयार करण्यात आली आहे. आर्थिक जिहादच्या माध्यमातून देशाला मदत करण्याचा हा प्रयत्न असून आमच्या लढाऊ बाण्यामुळे अमेरिकेच्या लष्करी वर्चस्वाला आम्ही जबरदस्त धक्का दिल्याचा त्यांचा दावा आहे.

इराण आणि अमेरिकेचं युद्ध आता आणखी वेगळ्या वळणावर पोहोचलं आहे. इराणी सेनेनं अमेरिकन सैनिकाला मारणाऱ्या किंवा पकडणाऱ्या व्यक्तीला ३० हजार डॉलर, म्हणजेच जवळपास २८ लाख रुपयांचं इनाम देण्याची घोषणा केली आहे. विशेष म्हणजे हे काम एखाद्या महिलेनं केलं, तर इनामाची रक्कम दुप्पट म्हणजे ६० हजार डॉलर असेल. या घोषणेमुळे इराणच्या युद्धनीतीबरोबरच त्यांच्या आक्रमक भूमिकेचीही चर्चा सुरू झाली आहे. इराणी सेनेचे कमांडर-इन-चीफ अमीर हातमी यांनी तेहरानमध्ये या योजनेची घोषणा केली. त्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक मागण्या आल्यानंतर ही योजना तयार करण्यात आली आहे. आर्थिक जिहादच्या माध्यमातून देशाला मदत करण्याचा हा प्रयत्न असून आमच्या लढाऊ बाण्यामुळे अमेरिकेच्या लष्करी वर्चस्वाला आम्ही जबरदस्त धक्का दिल्याचा त्यांचा दावा आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या 'आम्ही इराणचा पराभव करू आणि त्यानंतर होर्मुज सामुद्रधुनी अमेरिकन प्रदेश म्हणून घोषित करू' या वक्तव्यावरही ताशेरे ओढले. द जेरुसलेम पोस्टच्या वृत्तानुसार, हातमी यांनी इराणनं अमेरिकन सैन्याला प्रभावीपणे माघार घेण्यास भाग पाडल्याचा दावा केला. आता अमेरिकेला फारसच्या आखातात, ओमानच्या समुद्रात किंवा होर्मुज सामुद्रधुनीत प्रवेश करण्याची परवानगी नसल्याचंही त्यांनी म्हटलं. इराणनं शनिवारी कतारवरही गंभीर आरोप केले. कतारनं आपले तीन पायलट २ मार्चपासून कैदेत ठेवल्याचा आरोप इराणनं केला. अमेरिका आणि इस्रायलसोबत सुरू झालेल्या युद्धाच्या सुरुवातीच्या काळात त्यांचं एसयू-२४ विमान कतारच्या हवाई संरक्षण यंत्रणेच्या निशाण्यावर आलं होतं. पायलटांनी पॅराशूटच्या मदतीनं आपला जीव वाचवला. मात्र त्यानंतर कतारच्या अधिकाऱ्यांनी त्यांना ताब्यात घेतलं. इराणचा दावा आहे की, याआधी या तीन पायलटांचा कोणताही ठावठिकाणा त्यांना माहीत नव्हता. आता रेड क्रॉसकडे त्यांच्या स्थितीची चौकशी करून त्यांना कुटुंबीयांची भेट घडवून आणण्याची मागणी करण्यात आली आहे. कतारच्या परराष्ट्र मंत्रालयानं मात्र इराणचे आरोप स्पष्टपणे फेटाळले आहेत. कतारनं कोणत्याही इराणी पायलटला ताब्यात घेतलं नसल्याचं त्यांचं म्हणणं आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, इराणी विमानांनी कतारच्या हवाई हद्दीत प्रवेश केला होता. कतारनं पायलटांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायद्यानुसार आपल्या हद्दीच्या संरक्षणासाठी आम्ही कारवाई केली. कतारनं मार्चच्या सुरुवातीलाच आपल्या हवाई दलानं दोन इराणी विमानं पाडल्याचं सांगितलं होतं. त्यानंतर कतारच्या शोध आणि बचाव पथकांनी पायलटांचा शोध घेतल्याचा दावा करण्यात आला. एका पायलटचा मृतदेह सापडल्यानंतर तो इराणकडे सोपवण्यासाठी कतारनं संपर्क साधला होता. एप्रिलमध्ये कतारनं आपल्या शोध आणि बचाव मोहिमेची माहिती देण्याची तयारीही दर्शवली होती. मात्र, इराणनं त्याला कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचं कतारचं म्हणणं आहे. इराण, अमेरिका आणि कतारमधील या आरोप-प्रत्यारोपांमुळं या देशांमधील तणाव आणखी वाढला आहे. एका बाजूला अमेरिकन सैनिकांवर इनामाची घोषणा करण्यात आली आहे, तर दुसऱ्या बाजूला बेपत्ता पायलटांच्या मुद्द्यावरून इराण आणि कतार आमनेसामने आले आहेत. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाकडे आंतरराष्ट्रीय समुदायाचं लक्ष लागलं आहे.

## संस्कृत सुभाषित

आपदाम् अपहर्तारं, दातारं सर्वसंपदाम्

अर्थ : म्हणजे – आपदा – विपत्तीचे हरण करणारा व सर्व संपदा देणारा – असा राम हा अर्थ अधिक चांगला कळतो.

## गुरु वचन

### भक्ताचे समाधान

दक्षिण भारतात एक शेतकरी राहात होता. तो शेतीची कामे करण्यासह भक्तीमय पदेही रचत असे तसेच आजारी व निराधार लोकांची सेवाही करत होता. भगवान श्रीकृष्ण त्याचे आराध्यदेवत होते. भगवान श्रीकृष्णांच्या लिला असलेला ग्रंथ श्रीमद भागवताचे लोकभाषेत अनुवाद करायचा असे त्याने ठरविले होते. ज्यामुळे येथील लोक प्रभूंच्या लिलांचा आनंद घेऊ शकतील.

शेतकऱ्याने कितीतरी वर्षाच्या अथक परिश्रमाने भागवताचा अनुवाद पुर्ण केला. एका दिवशी एक विद्वान संत त्याच्या नगरीत प्रवचन देण्यासाठी आले. त्यांना शेतकऱ्यांच्या भक्तीरचना आवडलेल्या होत्या. त्यांनी भागवताच्या अनुवादाचे बाड पाहिले. तेव्हा त्यांना आश्चर्य वाटले ते म्हणाले की, या अनुवादाची भाषा समर्थ आणि सक्षम अशी आहे. तू अशा उत्कृष्ट भाषेचा वापर कसा काय केला. त्यांनी त्याला सल्ला दिला की या राज्यातील राजाला तू हा ग्रंथ भेट दे. ते खुप धार्मिक वृत्तीचे आहेत. शिवाय माझे मित्रही. माझ्या सांगण्याने ते तुला या ग्रंथासाठी योग्य असे बक्षीसही देतील. बक्षीसस्वरुपात तुला अनेक गावांची जहागिरीसुद्धा देऊ शकतात. भक्त कवी शेतकऱ्याने सांगितले, मी आपल्या शेतात कष्ट करून पिकविलेल्या पिके विकून माझ्या कुटुंबियांचे पालन पोषण करतो. यापेक्षा जास्त असलेले धन, संपत्ती माझ्या भक्तीमध्ये बाधा उत्पन्न करेल. व मी हा ग्रंथ भगवानांच्या पावनचरित्राला सर्वसामान्यापर्यंत पोहोचविण्यासाठी रचला आहे. धनदौलत व संपत्तीसाठी नाही. संत मग भक्त शेतकऱ्याची विरक्तीची भावना पाहुन आश्चर्यचकित झाले.

## उपदेशकथा

### स्वभाव

समानशिले व्यवनेषु सख्यम हे सुभाषित आपण वारंवार ऐकतो आणि त्याचे प्रत्यंतर समाजात वावरताना आपणाला पदोपदी येतेही. याच सुभाषिताचा दाखला देणारी ही कथा. एका साध्या संवादातून आपणास बोध मिळेल. एकदा प्रचंड महापूर आल्याने नदीच्या पात्रातून दोन भांडी वाहत होती. त्यापैकी एक भांडे होते पितळेचे तर दुसरे भांडे होते मातीचे. त्या पुरातून वाहत जातानाच त्यांच्यातून संवाद चालला होता. पितळेचे भांडे मातीच्या भांड्याला म्हणत होते, मित्रा, तू इतक्या दुरुन का चालला आहेस? माझ्याजवळ ये. आपण दोघे हातात हात घालून जाऊ. कशी मजा येईल. मला तुला डोळे भरून पाहता येईल आणि प्रचंड वेगाने वाहणाऱ्या या पाण्यापासून तुझे रक्षणही करता येईल. मातीच्या भांड्याने पितळेच्या भांड्याचे आभार मानले आणि ते म्हणाले, कृपा करून कोणत्याही ास्थितीत तू माझ्याजवळ येऊ नकोस. तुझीच मला सर्वात जास्त भीती आहे. तुझा थोडासा जरी धक्का मला लागला तरी माझ्या ठिकऱ्या उडतील. तुझा–माझा स्वभावच भिन्न आहे.

कथा उपदेश : भिन्न स्वभावांचे, छंदांचे लोक एकत्र कसे येणार?

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | करण:कौलव १९:१३:३५ |
| २५ ऑगस्ट २०२६ | करण:तैतिल (अहोरात्र) |
| मंगळवार | सूर्य:सिंह |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:मकर०३:०५:५१ |
| श्रावण शके | हिजरी सन् – १४४८ |
| संवत्– १९४८ | मुस्लिम मास – रबिलावल |
| संवत्सर – पराभवनाम | तारीख – ११ |
| अयन– दक्षिणयन | विशेष |
| मास– श्रावण | भोमप्रदोष |
| ऋतु– सौर शरद | |
| शुक्ल पक्ष | |
| तिथि:त्रयोदशी (अहोरात्र) | |
| नक्षत्र:उत्तराषाढा | |
| २२:५०:५६ | |
| योग:आयुष्मान | |
| ०७:४०:२८ | |



मंगळागौरी पूजन

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०४९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 8 | | | 9 | | | | |
| 3 | | 7 | | | 2 | | 4 | 8 |
| | | | 8 | | 7 | 3 | 6 | |
| | | 5 | | 6 | 8 | | 9 | |
| | | 4 | 7 | | 5 | 8 | | |
| | 2 | | 4 | 1 | | 7 | | |
| | 4 | 8 | 5 | | 3 | | | |
| 1 | 7 | | 6 | | | 2 | | 3 |
| | | | | 7 | | | 8 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

#### सूडोकु क्र. १०४८ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 5 | 3 | 6 | 1 | 4 | 9 | 2 | 7 |
| 7 | 1 | 9 | 2 | 5 | 8 | 4 | 6 | 3 |
| 6 | 4 | 2 | 9 | 7 | 3 | 8 | 5 | 1 |
| 4 | 3 | 5 | 8 | 6 | 1 | 7 | 9 | 2 |
| 2 | 8 | 1 | 7 | 4 | 9 | 5 | 3 | 6 |
| 9 | 6 | 7 | 5 | 3 | 2 | 1 | 4 | 8 |
| 3 | 7 | 8 | 4 | 9 | 6 | 2 | 1 | 5 |
| 1 | 2 | 4 | 3 | 8 | 5 | 6 | 7 | 9 |
| 5 | 9 | 6 | 1 | 2 | 7 | 3 | 8 | 4 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १८२५ – उरुग्वे हा दक्षिण अमेरिकन देश स्वातंत्र झाला.
- १९१९ – जगातील पहिली प्रवासी विमानसेवा लंडन व पॅरीस या दरम्यान सुरू करण्यात आली.
- १९८४ – पाकिस्तानी चाच्यांनी पळवलेल्या भारतीय विमानातील प्रवासी दुबईत मुक्त.

### राष्ट्रीय

- १९४३ – आझाद हिंद सेनेची स्थापना.
- १९७५ – उत्तर प्रदेशामध्ये बुंदेलखंड विद्यापीठाची स्थापना.
- २००३ – मुंबईत दोन बॉम्बस्फोटात ४७ जण ठार झाले.

### जन्म

- १८६७ – मायकेल फॅरेडे, ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ
- १९२३ – गंगाधर गाडगीळ, मराठी साहित्यिक, अर्थतज्ज्ञ.
- १९२४ – प्रेम माथुर, प्रवासी विमानाचे संचालन करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला वैमानिक.
- १९३० – शॉन कॉनरी, स्कॉटिश अभिनेते, पडद्यावरचा आद्य जेम्स बाँड.
- १९६२ – तस्लीमा नसरीन, बांगलादेशी स्त्रीमुक्तीवादी लेखिका.

### निधन

- १७८४ – लॉर्ड जॉन इडन ऑकलंड, भारताचे माजी गव्हर्नर जनरल.
- १९२६ – मुन्शी प्रमचंद, आंतरराष्ट्रीय ख्यातीचे हिंदी साहित्यिक.
- २००१ – डॉ. व. दि. कुलकर्णी (वसंत दिगंबर कुलकर्णी), मराठी समीक्षक, संतसाहित्याचे अभ्यासक
- २००६ – विजय मेहरा, भारताचे माजी कसोटी फलंदाज.
- २००७ – दादी प्रकाशमणी, ब्रह्मकुमारी प्रमुख.

## : SMS :

Teacher: Batao, 0.80 Hectare me kitne Acre hote hain?

Student: Madam, mere chacha ne Ohar me liya hai, usme to abhi sirf 2 khambe aur ek board hai - "Plot Bechna Hai"!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३१.२ | २३.४ |
| अहमदनगर | ३१.३ | २२.९ |
| अकोला | ३५.२ | २५.८ |
| अमरावती | ३३.९ | २५.६ |
| बीड | ३३.७ | २६.३ |
| भंडारा | ३६ | २५.७ |
| बुलढाणा | ४२.९ | २७.४ |
| चंद्रपूर | ३३ | २६.१ |
| चेन्नई | ४०.९ | ३१.७ |
| नवी दिल्ली | ४२.४ | ३०.५ |
| धुळे | ३६.२ | २५.३ |
| गोंदिया | ३५.२ | २५.४ |
| जळगाव | ३५.९ | २५.५ |
| कोल्हापूर | २६.२ | २२.८ |
| लातूर | ३१.४ | २३.९ |
| मुंबई | ३४.२ | ३०.२ |
| नागपूर | ३६.५ | २५.८ |
| नांदेड | ३४ | २५.७ |
| नंदूरबार | ३२.३ | २४.४ |
| नाशिक | ३०.४ | २३.६ |
| पुणे | २६.४ | २२.३ |
| पंढरपूर | ३३.८ | २४.२ |
| सातारा | २९.८ | २२.६ |
| सांगली | २८.८ | २३.१ |
| सोलापूर | ३३.१ | २४.४ |
| वर्धा | ३३.८ | २५.९ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** सामाजिक कार्यात यश मिळेल, कौतुक होईल. प्रगल्भ विचारसरणी यांतून आपल्या अडचणींवर सहजपणे मात कराल.

**वृषभ :** लेखक, शिक्षकांकडून चांगली कामगिरी होणार आहे. मन शांत राहिल्याने त्याचा व्यवसायावर चांगला परिणाम होईल.

**मिथुन :** जुने मित्र भेटल्याने मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन केले जाईल. नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांना सुसंधी लाभतील.

**कर्क :** नावीण्यपूर्ण कलाकृतींचा ध्यास घ्याल. आपले आवडते छंद जोपासण्यासाठी वेळ देता येईल.

**सिंह :** सतत शुभशकुनांचा सतत प्रत्यय येईल. गुरुची कृपा आपल्या प्रयत्नांना यश देईल. व्यवसायात नवीन हितसंबंध निर्माण करु शकाल.

**कन्या :** अपेक्षित गाठीभेटी झाल्याने मन प्रसन्न होईल. एखादा निर्णय अनपेक्षितपणे झटपट घेतला जाईल. आत्मविश्वास व मनोबल उत्तम राहील.

**तुळ :** अचानक अनावश्यक खर्च उद्भवतील. आपल्या आवडत्या छंदास व्यावसायिक स्वरुप देण्यास योग्य काळ आहे.

**वृश्चिक :** सार्वजनिक कामात यश मिळेल. मिष्टान्न भोजनाचे योग येतील. गुंतवणूकीतून लाभ होतील. आपल्या इच्छा, अपेक्षा कृतीत आल्याने समाधान लाभेल.

**धनु :** अनावश्यक खर्च उद्भवतील. आपली बाजू प्रभावीपणे मांडल्यामुळेच आपल्या मतांचा आदर केला जाईल. सांस्कृतिक कार्यक्रमातून आनंद लुटाल.

**मकर :** नोकरीतही अनपेक्षित चांगला बदल झाल्याने समाधान लाभेल. अधिकारावर असणाऱ्या स्त्री व्यक्तीकडून आपले लांबलेले काम होईल.

**कुंभ :** तरुणांना नोकरीत सुसंधी लाभतील. वरिष्ठांची मर्जी संपादन कराल. व्यवसायावर चांगला परिणाम होईल.

**मीन :** व्यवसायातील कामाचा वेग वाढेल. मिळालेल्या संधीचा लाभ आपले भविष्य उज्वल करणारा राहील. रचनात्मक कामातून लाभ होतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०४९



### आडवे शब्द

१. दृढ, पक्का
३. देखणा
६. मृत्युसमय
९. पाऊल (हिंदी)
१२. चांदी
१४. सरिता
१५. विटीसाठी खणलेला खड्डा
१६. पुख्खा झोडणे
१८. हनुमानाच्या या नावात एक पांडवही आहे
१९. गंध
२०. अंत:करण
२२. बोच
२३. शृंगार (हिंदी)
२६. संगीतातील एक राग
२८. इंग्रजांच्या काळची एक पदवी
३०. गणपती
३१. खिडकी
३२. जमिनीवरील कर
३३. चिक्कू, कंजूष
३४. रात्र, ३५. महिना
३८. कमळ
३९. सावध
४०. अप्पलपोटा
४२. कणिक भिजण्याचे पात्र
४४. निरोगी
४५. याला अक्कल नसते अशी म्हण आहे
४७. लाकूड
४८. आणि
४९. दमट, ओलसर
५१. पराभव, हार
५२. पशूतुल्य मनुष्य
५३. मत्सर, द्वेष
५५. मस्ती
५७. लोणच्यासाठी चिनीमातीची चांगली!
५८. चांदी
६०. उसाचा रस काढण्याचे यंत्र
६२. रात्र
६४. पापणी (हिंदी)
६५. मदत करणारे
६७. स्त्री
६८. भक्त प्रल्हादाची आई
६९. तारणारे
७१. प्रमाणपत्र, दाखला
७३. ब्राह्मण
७५. मराठी मुळाक्षरातील पहिले
७६. हात
७७. उटण्यातील सुवासिक वनस्पती
७९. विशाल, उत्कृष्ट
८०. एक प्रकारचा क्षार
८१. सैनिकांना केला जाणारा मालपुरवठा
८२. सारखे

### उभे शब्द

१. अगदीच ऐकू न येणारा
२. टप्पा
४. लोक
५. भांगात घालायचा एक दागिना
६. शरीर
७. मऊ
८. वेल
९. जास्तीत जास्त
१०. भाव, किंमत
११. सापाची विषारी जात
१३. तेव्हा (हिंदी)
१७. उधार
१९. दिवस
२१. डोळे
२३. कुंकू (हिंदी)
२४. थंड, शीत
२५. अबोध
२७. देवाचे द्वारपाल
२९. वस्ती
२९अ. ठीक
३०. न बोलता, मुकाट्याने
३४. राजाविषयी निष्ठा असणारा
३५. गावचा कारभारी अधिकारी
३६. शिवरायांच्या अष्टप्रधानांपैकी एक
३७. दयाळू
३८. आदरार्थी संबोधन
३९. प्रसंगावधान
४१. जवळीक
४३. रात्री सुगंध पसरवणाऱ्या फुलांचे झुडूप
४६. खर्चाच्या उलट
४७. आसामचे जुने नाव
५०. एक उभयचर प्राणी
५२. जीवघेण्या वेदना
५४. मित्र (हिंदी)
५६. डोळ्यातील बाहुली (सं.)
५७. अंड्याच्या आतील भाग
५९. कंबर
६१. सोने
६३. तीव्र रेचक
६६. चंद्रोदयाबरोबर उमलणारे कमळ
७०. विष्णू
७२. परका, अपरिचित
७३. मनोभंग
७४. आनंद (सं.)
७६. पदार्थाचा लहान अंश
७८. मगज
७९. नकलून काढलेला मजकूर

### जम्बो शब्दकोडे क्र. १०४८ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कडेकोट ४.वारेमाप ७.नतमस्तक ११.करडई १३.गरम १५.वास १६.चरा १८.वरण २०.हाटक २२.खनन २४.राम २५.टच २६.माळी २७.लगड २९.वसंत ३१.नायक ३२.माकड ३४.हराम ३५.बाका ३६.डर ३८.नावडतीचे मीठ ४०.बारका ४२.सकटनिकट ४६.नायनाट ४७.जनकजननी ५०.कमळ ५२.नगर ५३.पत्रास ५५.टक ५६.कमालकिमान ६०.उमर ६१.रविवार ६२.अट ६४.सरकार ६६.आदानप्रदान ६८.चाकवत ७०.खारट ७१.समवेत ७३.खडा ७४.रामरक्षा ७७.लांडगा आला रे आला ८१.काजळ ८२.कपटी ८३.वर ८४.शीतल ८५.कानन

उभे उत्तर : १.कडवट २.कोकण ३.टर ४.वाईट ५.माग ६.परखड ८.तवा ९.मसलत १०.कचरा १२.डहाळी १४.मन १७.रामराम १९.रचनाकर २१.कलकलाट २३.नव २६.माकड २८.गड ३०.संमती ३३.सावट ३४.हमी ३४अ.राठ ३५.बाबागाडी ३७.रसना ३८.नाक ३९.चेतक ४१.कानामात्राउकार वेलांटी ४३.कटकट ४४.निखळ ४५.पनीर ४७.जहाल ४८.जनन ४९.नग ५१.मकर ५४.समर ५६.कवायत ५७.मार ५८.किल्लेदार ५९.खसखस ६२.अदाकार ६३.टन ६५.पोचा ६६.आखाडा ६७.नटराज ६९.कमला ७२.तड ७३.खलाशी ७५.मळका ७६.क्षालन ७८.गाव ७९.आर ८०.रेघ ८१.काल

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे





### सुयश ट्रस्टने ग्रामीण महिलांना दिली स्वावलंबनाची नवी दिशा

**पुणे : दैनिक संध्या**

देशातील दुर्गम व वनवासी भागातील कुटुंबांना स्वावलंबनाची दिशा देणाऱ्या 'सुयश चॅरिटेबल ट्रस्ट'कडून महिलांच्या आर्थिक व सामाजिक सक्षमीकरणावर विशेष भर दिला जात आहे. सेवाकार्याच्या ४६ वर्षांच्या वाटचालीत संस्थेचे कार्य सात राज्यांतील पाच हजारांहून अधिक गावांपर्यंत पोहोचले असून, स्थानिक साधनसंपत्तीचा वापर करून रोजगारनिर्मितीला प्रोत्साहन दिले जात असल्याची माहिती संस्थेचे संस्थापक अध्यक्ष यशवंत घैसास यांनी दिली. या वेळी कार्याध्यक्ष स्मिता घैसास, शलाका घैसास आदी उपस्थित होते. संस्थेच्या दहा सूत्रीय कार्यपद्धतीच्या माध्यमातून ग्रामीण व वनवासी भागातील नागरिकांना विविध कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. कृषी प्रक्रिया, कुटीर उद्योग आणि शेतीपूरक व्यवसायांना प्रोत्साहन देत सुमारे पाच हजार कुटुंबांना रोजगाराच्या माध्यमातून स्वावलंबी करण्यात आले आहे. त्यामुळे रोजगारासाठी होणारे स्थलांतर रोखण्यासही मदत झाली आहे. महिलांना घरगुती उद्योगाच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी झाडू तयार करणे, मसाले निर्मिती, कागदी पिशव्या तयार करणे, आमचूर निर्मिती, शेतीपूरक व्यवसाय तसेच विविध कृषी प्रक्रिया उद्योग सुरू करण्यात आले आहेत. नंदुरबारमधील आंबा प्रक्रिया उपक्रमातून वार्षिक सुमारे १० कोटी रुपयांची उलाढाल होत असून, ओडिशातील झाडू निर्मिती उपक्रमातून सुमारे १ कोटी ७५ लाख रुपयांची उलाढाल होत आहे. या उपक्रमांमध्ये महिलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग असून, त्यांच्या उत्पन्नात वाढ होऊन कुटुंबांच्या आर्थिक स्थैर्याला हातभार लागत आहे. घैसास यांनी सांगितले की, केवळ मदत करण्यापेक्षा ग्रामीण व वनवासी समाजाला स्वतःच्या पायावर उभे करणे हा संस्थेच्या कार्याचा मुख्य उद्देश आहे. स्थानिक कौशल्य, उपलब्ध साधनसंपत्ती आणि बाजारपेठेची सांगड घालून महिलांसह संपूर्ण कुटुंबाला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न भविष्यातही सुरू राहणार आहे.

### ताणतणावातून मुक्त होण्यासाठी दृष्टिकोन बदला : सरश्री



**पुणे : दैनिक संध्या**

जीवनातील ताणतणाव, अस्थिरता आणि प्रतिकूल परिस्थितीतही आनंदी व प्रसन्न राहण्याचा मार्ग दाखविणारा विशेष आध्यात्मिक मार्गदर्शन कार्यक्रम पुण्यातील मनन आश्रम, सिंहगड रोड येथे आयोजित करण्यात आला. तेजज्ञान फाउंडेशनचे संस्थापक सरश्री यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रत्यक्ष आणि ऑनलाईन माध्यमातून ३० हजारांहून अधिक साधकांनी सहभाग घेतला. मनावरील ताण कमी करून अंतर्मनात शांतता आणि स्थैर्य निर्माण करण्यासाठी साक्षीभावाची दृष्टी विकसित करणे आवश्यक असल्याचे सरश्री यांनी सांगितले. जीवनातील घटना घडत असताना त्यामध्ये अडकून न पडता त्यांच्याकडे एका साक्षीदाराप्रमाणे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित करण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी घड्याळाचे उदाहरण देत त्यांनी 'योग' आणि परस्परावलंबित्वाची संकल्पना स्पष्ट केली. घड्याळाचे प्रत्येक पुर्जे स्वतंत्रपणे पाहिल्यास ते घड्याळ नसते. मात्र सर्व घटक योग्य प्रकारे एकत्र येऊन कार्य करू लागले की घड्याळ अस्तित्वात येते. त्याचप्रमाणे मानवी जीवनात शरीर, इंद्रिये, मन, विचार आणि विविध अनुभव यांचा परस्पर संबंध हा एक 'महायोग' असतो. त्यामुळे स्वतःकडे केवळ शरीर म्हणून पाहण्याऐवजी संपूर्ण अस्तित्वाकडे व्यापक दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे आहे, असा संदेश सरश्री यांनी दिला. 'संपूर्ण चित्र समजून घ्या, मग जगा आणि निर्णय घ्या,' हा विचार कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला. अपूर्ण माहिती किंवा एका परिस्थितीवर आधारित निष्कर्ष मनात अस्थिरता निर्माण करू शकतात. त्यामुळे प्रत्येक प्रसंगाकडे सकारात्मक आणि साक्षीभावाने पाहिल्यास जीवनातील अनेक आव्हाने अधिक शांतपणे हाताळता येऊ शकतात.

### संसदीय कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव घेत विद्यार्थ्यांनी साकारली अभिरूप संसद

**पुणे : दैनिक संध्या**



सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या भूमिका, विधेयकांवरील चर्चा, प्रश्नोत्तरांचा तास आणि विविध विषयांवरील वादविवाद अशा संसदीय वातावरणात जाधवर विधी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष संसदीय कामकाजाचा अनुभव घेतला. संविधानाविषयी जागरूकता, चिकित्सक विचार, प्रभावी वक्तृत्व आणि विधिनिर्मितीचे कौशल्य विकसित करण्यासाठी जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सच्या जाधवर विधी महाविद्यालयाच्या वतीने अभिरूप संसद २०२६ चे आयोजन करण्यात आले. नऱ्हे येथील शैक्षणिक संकुलात अभिरूप संसदेचे आयोजन करण्यात आले होते. जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्सचे संस्थापक अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुधाकर जाधवर आणि उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राचार्या डॉ. सपना सुकृत देव यांच्या नेतृत्वाखाली या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. अभिरूप संसदेत विद्यार्थ्यांनी कायदे निर्मात्यांची भूमिका साकारत संसदीय कार्यपद्धती आणि प्रक्रियेचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. समकालीन राष्ट्रीय विषयांवर चर्चा व वादविवाद करण्यात आले. तसेच संसद सदस्यांच्या भूमिकेतून विद्यार्थ्यांनी आपली मते मांडत चिकित्सक विचार, तार्किक मांडणी आणि प्रभावी वक्तृत्वाचे कौशल्य दाखविले. ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, विद्यार्थ्यांनी विधेयक मांडणी, प्रश्नोत्तरे, चर्चा, वादविवाद तसेच सत्ताधारी आणि विरोधी पक्षाच्या भूमिका प्रभावीपणे साकारल्या. संविधान, कायदा आणि लोकशाही व्यवस्थेचे ज्ञान प्रत्यक्ष कृतीतून मांडताना विद्यार्थ्यांनी संसदीय शिस्त, नेतृत्वगुण आणि कायदेशीर विचारक्षमता यांचे दर्शन घडविले. या उपक्रमासाठी अनुभवी प्राध्यापकांचे परीक्षक मंडळ होते. विद्यार्थ्यांची तयारी, विषयावरील पकड, युक्तिवाद, संसदीय शिस्त आणि प्रभावी सादरीकरणाच्या आधारे परीक्षण व मूल्यमापन करण्यात आले. सहभागी तसेच विजेत्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देण्यात आली. परीक्षकांनी केलेले मार्गदर्शन विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरले. विद्यार्थ्यांना केवळ कायद्याचे शैक्षणिक ज्ञान न देता संसदीय लोकशाही, संविधान आणि विधिनिर्मिती प्रक्रियेची प्रत्यक्ष जाणीव करून देणे, तसेच भविष्यातील सक्षम कायदेतज्ज्ञ आणि लोकशाही प्रक्रियेतील जबाबदार नागरिक म्हणून त्यांची जडणघडण करणे हा या उपक्रमामागील उद्देश होता. या अभिरूप संसदेचे समन्वयक म्हणून डॉ. सौम्या एस. कृष्णन आणि अभिषेक यादव यांनी काम पाहिले.

# महेश इंडस्ट्रियल ग्रुपच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा दिमाखदार शुभारंभ

## संस्थापक स्व. भगीरथजी तपाडिया यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा प्रारंभ

■ पुणे (दै. संध्या)




महेश इंडस्ट्रियल ग्रुपच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाचा शुभारंभ तसेच संस्थापक स्व. श्री. भगीरथजी तपाडिया यांच्या जन्मशताब्दी वर्षाचा प्रारंभ 'संगम- वारशाचा गौरव, भविष्याची प्रेरणा' या विशेष सोहळ्याने उत्साहात झाला. पुणे इंटरनॅशनल सेंटर येथे महेश्वरी समाजातील अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. गेल्या ५० वर्षांत महेश इंडस्ट्रियल ग्रुपने उद्योजकांना एकत्र आणत संवाद, ज्ञानविनिमय, परस्पर सहकार्य आणि उद्योजकीय विकासासाठी प्रभावी व्यासपीठ निर्माण केले आहे. संस्थापक स्व. श्री. भगीरथजी तपाडिया यांनी रुजवलेल्या उद्योजकीय मूल्यांचा आणि दूरदृष्टीचा वारसा पुढे नेत, सुवर्णमहोत्सवी वर्षात संस्थेला नव्या दिशेने आणि व्यापक व्याप्तीकडे घेऊन जाण्याचा संकल्प या सोहळ्यातून व्यक्त करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे विश्वस्त श्री. रतन राठी यांच्या स्वागतपर मनोगताने झाली. त्यानंतर विश्वस्त श्री. बजरंग लोहिया यांनी संस्थेच्या स्थापनेमागील उद्दिष्टे, पायाभरणी आणि गेल्या पाच दशकांत संस्थेला दिशा देणाऱ्या नेतृत्वाचा आढावा घेतला. संस्थेच्या प्रवासातील सातत्य, मूल्याधिष्ठित कार्यपद्धती आणि उद्योजकांना एकत्र आणण्याच्या भूमिकेवर त्यांनी प्रकाश टाकला. या प्रसंगी डॉ. परिमल मर्चंट, डॉ. संजय मालपाणी आणि श्री. विनोद बहेती यांनी उपस्थितांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. डॉ. परिमल मर्चंट यांनी कुटुंब व्यवसायातील महिलांची भूमिका, मूल्याधिष्ठित नेतृत्व आणि व्यवसायातील सकारात्मक विचारसरणी यावर मार्गदर्शन केले. संस्थेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाच्या अध्यक्षा श्रीमती नेहा लड्डा यांच्या नेतृत्वाखाली महेश इंडस्ट्रियल ग्रुपच्या राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाकांक्षी उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला.

संस्थेच्या विविध उपक्रमांची, सदस्यांची आणि गेल्या पाच दशकांत उभारलेल्या सामूहिक सामर्थ्याची सांगड घालत, संस्थेच्या विचारांचा आणि उद्योजकीय संस्कृतीचा देशभर विस्तार करण्याच्या दिशेने हे महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. देशभरातील उद्योजकांना जोडणे, ज्ञान व अनुभवांची देवाणघेवाण वाढवणे आणि नव्या पिढीला उद्योजकतेसाठी प्रेरित करणे हा या राष्ट्रीय उपक्रमाचा व्यापक उद्देश आहे. कार्यक्रमादरम्यान विश्वस्त श्री. राजेंद्र तपाडिया यांनी संस्थेचे संस्थापक आणि त्यांचे वडील स्व. श्री. भगीरथजी तपाडिया यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण केली. संस्थेच्या निर्मितीमागील त्यांचे योगदान, उद्योजकीय दृष्टी आणि समाजासाठी केलेले कार्य यांचे स्मरण करत त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याची बांधिलकी त्यांनी व्यक्त केली. संस्थापकांच्या जन्मशताब्दी वर्षाचा प्रारंभ हा संपूर्ण सोहळ्याचा भावनिक आणि प्रेरणादायी केंद्रबिंदू ठरला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सचिव श्री. कुश राठी आणि श्रीमती आकांक्षा राठी यांनी प्रभावीपणे केले. श्री. आदित्य तपाडिया यांनी आभार मानले. गोपाल झंवर आणि शाम भूतडा यांनी स्वागत केले. या कार्यक्रमाला हीरालाल मालू, राजकुमार अग्रवाल, नितीन न्याती, विठ्ठल मनियार, अभय करवा, रवि राठी, गिरधर काळे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती होती. वारशाचा गौरव, वर्तमानातील कर्तृत्वाचा उत्सव आणि भविष्याची प्रेरणा यांचा सुंदर संगम घडवणाऱ्या या सोहळ्याच्या माध्यमातून महेश इंडस्ट्रियल ग्रुपच्या सुवर्णमहोत्सवी वर्षाची उत्साहपूर्ण सुरुवात झाली. संस्थापकांच्या विचारांना नवी दिशा देत, सामूहिक शक्तीच्या बळावर राष्ट्रीय स्तरावर उद्योजकतेचे नवे पर्व निर्माण करण्याचा निर्धार या सोहळ्यातून व्यक्त करण्यात आला.

## बजाज ऑटोने लाँच केल्या नव्या पल्सर १५० आणि पल्सर १२५

■ पुणे (दै. संध्या)

पल्सर ब्रँडच्या 25 वर्षांच्या प्रवासाच्या निमित्ताने बजाज ऑटो लिमिटेडने नव्या पल्सर 150 आणि पल्सर 125 मोटरसायकलींचे अनावरण केले. परफॉर्मन्स, आक्रमक डिझाइन आणि रायडिंगचा खास अनुभव ही पल्सरची ओळख कायम ठेवत दोन्ही मॉडेल्समध्ये नवे इंजिन, गिअरबॉक्स, मोनोशॉक सस्पेन्शन, 5-इंच TFT कन्सोल, राइड मोड्स, Crawl Tech आणि Google Maps नॅव्हिगेशन यांसारख्या आधुनिक सुविधा देण्यात आल्या आहेत. 2001 मध्ये लाँच झाल्यापासून पल्सरने भारतीय मोटरसायकल बाजारपेठेत स्पोर्ट्स बाइकिंगची नवी ओळख निर्माण केली. दैनंदिन प्रवासाच्या साधनापलीकडे जाऊन परफॉर्मन्स, आधुनिक तंत्रज्ञान आणि दमदार व्यक्तिमत्त्व असलेल्या मोटरसायकलचा अनुभव भारतीय रायडर्सना देण्यात पल्सरची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. गेल्या 25 वर्षांत पल्सरच्या 20 दशलक्षांहून अधिक मोटरसायकलींची विक्री झाली असून, हा ब्रँड 40 हून अधिक देशांमध्ये पोहोचला आहे. नव्या पल्सर 150 आणि पल्सर 125 मध्ये मस्क्युलर टँक, आक्रमक डिझाइन, इंजिनचा खास आवाज आणि दमदार पिकअप यांसारखी पल्सरची वैशिष्ट्यपूर्ण ओळख कायम ठेवण्यात आली आहे. मात्र, नव्या



पिढीच्या रायडर्सच्या गरजा लक्षात घेऊन इंजिनिअरिंग, तंत्रज्ञान आणि फीचर्समध्ये मोठे बदल करण्यात आले आहेत. दोन्ही मॉडेल्समध्ये पूर्णपणे नवे इंजिन आणि गिअरबॉक्स देण्यात आले आहेत. या श्रेणीत प्रथमच PVD पिस्टन रिंग्सचा वापर करण्यात आला असून, त्यामुळे घर्षण कमी होण्यास, इंजिनचे आयुष्य वाढण्यास आणि NVHमध्ये सुधारणा होण्यास मदत होते. पल्सर 150 मध्ये 149.5cc इंजिन असून ते 8,500 rpm वर 14 PS पॉवर आणि 6,500 rpm वर 13.7 Nm टॉर्क निर्माण करते. तर पल्सर 125 मध्ये 124.58cc इंजिन असून ते 8,000 rpm वर 12 PS पॉवर आणि 6,000 rpm वर 11 Nm टॉर्क देते. कंपनीच्या मते, पल्सर 125 ही बाजारपेठेतील सर्वाधिक पॉवरफुल 125cc मोटरसायकल आहे. सुधारित पॉवर-टू-वेट रेशोमुळे 0 ते 60 किमी/तास वेग अधिक वेगाने गाठता येतो. नव्या गिअरबॉक्समुळे कमी गिअर्समध्ये अधिक ट्रॅक्टिव्ह एफर्ट मिळत असल्याने कमी वेगातही चांगला परफॉर्मन्स मिळतो.

## एस्कॉर्ट्स कुबोटाचे एमयू ४५०२ आणि एमयू ५००२ ट्रॅक्टर लाँच

### उद्योगातील पहिली ८ वर्षांची हस्तांतरणीय वॉरंटी




■ पुणे (दै. संध्या)

एस्कॉर्ट्स कुबोटा लिमिटेडने दोन नवीन ट्रॅक्टर मॉडेल्स सादर केले आहेत – 45 हॉर्सपॉवर कुबोटा एमयू 4502 आणि 50 हॉर्सपॉवर कुबोटा एमयू 5002. या मॉडेल्समुळे कंपनीच्या 41–50 हॉर्सपॉवर श्रेणीतील प्रीमियम युटिलिटी ट्रॅक्टर पोर्टफोलिओ अधिक मजबूत होतो; जो भारतीय ट्रॅक्टर बाजारातील सर्वात मोठ्या आणि वेगाने वाढणाऱ्या विभागांपैकी एक आहे. या दोन्ही मॉडेल्सना उद्योगातील पहिली 8 वर्षांची हस्तांतरणीय वॉरंटी देण्यात आली आहे, जी या उत्पादनांची उच्च दर्जाची बांधणी-गुणवत्ता आणि दीर्घ कार्यक्षम आयुष्य याबाबत कंपनीचा असलेला दृढ विश्वास दर्शवते. दोन्ही ट्रॅक्टरमध्ये विश्वासार्ह कुबोटा केक्यूपी४ जपानी इंजिन देण्यात आले आहे. यामध्ये प्रगत १२एफ + ४आरमल्टी-स्पीड सिंक्रोमेश गिअरबॉक्स आहे, ज्यामुळे जड मशागतीपासून ते वाहतुकीपर्यंत प्रत्येक कामासाठी शेतकऱ्यांना योग्य वेग निवडता येतो. त्यामुळे काम अधिक वेगाने करता येते, अधिक क्षेत्र कमी वेळेत कव्हर करता येते आणि कामे लवकर पूर्ण करता येतात. ड्युअल स्टॅबिलायझर स्प्रिंग तंत्रज्ञानासह असलेली पॉम्पा लिफ्ट, अवजारे स्थिर ठेवण्यास आणि असमतल जमिनीवरही कामाची एकसमान खोली कायम राखण्यास मदत करते, ज्यामुळे अधिक चांगले आणि दर्जेदार परिणाम मिळतात. नवीन एमयू 4502 आणि एमयू 5002 हे अधिक उत्पादकता, आरामदायी वापर आणि विविध कामांमध्ये उत्कृष्ट कामगिरीची अपेक्षा असलेल्या आधुनिक भारतीय शेतकऱ्यांच्या गरजा लक्षात घेऊन विकसित करण्यात आले आहेत. या ट्रॅक्टर्समध्ये कुबोटाचे जागतिक डिझाइन आहे, जे बैलाच्या ताकद आणि चपळतेपासून प्रेरित आहे. अधिक चांगल्या दृश्यमानतेसह आकर्षक आणि प्रीमियम लूकसाठी यामध्ये फुल एलईडी लायटिंग देण्यात आले आहे. पूर्णपणे कव्हर्ड फ्लॅट-डेक प्लॅटफॉर्म, प्रीमियम बकेट सीट, सस्पेंडेड पेडल्स, डबल-ॲक्टिंग पॉवर स्टीअरिंग आणि एर्गोनॉमिक पद्धतीने मांडलेली नियंत्रणे यामुळे दीर्घकाळ काम करतानाही ऑपरेटरला अधिक आराम मिळतो. तसेच, बॅलन्सर शाफ्ट तंत्रज्ञानामुळे कंपने कमी राहतात, ज्यामुळे अधिक आरामदायी आणि सुरळीत ड्रायव्हिंग अनुभव मिळतो.

एस्कॉर्ट्स कुबोटा भारतात फार्मट्रॅक, पॉवरट्रॅक आणि कुबोटा या तीन ट्रॅक्टर ब्रँड्सचे संचालन करते, जे अनुक्रमे एंट्री-प्रीमियम, व्हॅल्यू आणि प्रीमियम सेगमेंटची पूर्तता करतात. नवीन एमयू 4502 आणि एमयू 5002 हे प्रीमियम कुबोटा ब्रँड अंतर्गत सादर करण्यात आले आहेत. या दोन नवीन मॉडेल्समुळे, एमयू रेंजमध्ये आता एमयू 4201, एमयू 4501, एमयू 4502, एमयू 5002 आणि एमयू 5502 यांचा समावेश झाला आहे, ज्यामुळे शेतकऱ्यांना प्रीमियम युटिलिटी ट्रॅक्टर्सची अधिक व्यापक आणि सर्वसमावेशक श्रेणी उपलब्ध झाली आहे.

## ज्येष्ठ नागरिकांच्या हक्काचा 'विश्रांती कट्टा'!

■ पुणे (दै. संध्या)

औंध-बोपोडी प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांना निवांत वेळ घालवता यावा, एकमेकांशी गप्पा मारता याव्यात, योगाभ्यास तसेच विविध उपक्रम राबवता यावेत, यासाठी औंध येथील राम-लक्ष्मण उद्यानात नगरसेवक सनी निम्हण यांच्या विकासनिधीतून 'विश्रांती कट्टा' उभारण्यात येणार आहे. पुण्यनगरीचे उपमहापौर श्री. परशुरामजी वाडेकर यांच्या शुभहस्ते या 'विश्रांती कट्ट्या'चे भूमिपूजन संपन्न झाले. यावेळी नगरसेवक सनी निम्हण, नगरसेविका सौ. भक्तीताई गायकवाड, सौ. सपनाताई छाजेड, सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. हनुमंतराव पडवळ, राम-लक्ष्मण गार्डनचे सचिव श्री. मेघराज चंदनाणी यांच्यासह प्रभागातील ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि इतर मान्यवर उपस्थित होते. ज्येष्ठ नागरिकांशी सातत्याने संपर्कात राहून काम करत असताना त्यांच्या अनेक गरजा आणि अपेक्षा जवळून समजून घेता आल्या. विशेषतः योगाभ्यास, सकाळचा व्यायाम, एकमेकांशी संवाद साधणे आणि निवांत वेळ घालवण्यासाठी योग्य जागेची गरज ज्येष्ठ नागरिकांकडून व्यक्त केली जात होती. राम-लक्ष्मण उद्यानात येणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधताना त्यांच्या या अपेक्षेची जाणीव झाली आणि त्यातूनच 'विश्रांती कट्टा' उभारण्याची संकल्पना पुढे आली. नगरसेवक सनी निम्हण म्हणाले, "ज्येष्ठ नागरिक हे आपल्या समाजाचे मार्गदर्शक आणि संस्कारांचे आधारस्तंभ आहेत. त्यांच्या अनुभवातून आणि मार्गदर्शनातून पुढील पिढीला अनेक गोष्टी शिकायला मिळतात. त्यामुळे ज्येष्ठ नागरिकांसाठी केवळ सुविधा निर्माण करणे नव्हे, तर त्यांना सन्मानाने, आनंदाने आणि आपुलकीच्या वातावरणात वेळ घालवता यावा, ही आपली जबाबदारी आहे. ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधताना त्यांच्या मनातील ही गरज जाणवली आणि त्यातूनच 'विश्रांती कट्टा'ची संकल्पना साकारली. हा कट्टा त्यांच्या आनंदाचा, संवादाचा आणि आरोग्याचा केंद्रबिंदू ठरेल, याचा मला आनंद आहे."



# आवडत्या पात्रातून संस्कारांची गोष्ट; पुण्यात बोनोबोनोचा अनोखा प्रयोग

## जपानी ॲनिमे, सकारात्मक मूल्ये आणि भारतीय भाषांना जोडण्याचा प्रयत्न

■ पुणे (दै. संध्या)

डोरेमॉन, शिनचान, मोटू-पतलू यांसारखी कार्टून पात्रे मुलांच्या जगाचा अविभाज्य भाग झाली आहेत. आता जपानमधील 'बोनोबोनो' हे निरागस आणि आपुलकीचे पात्र भारतीय मुलांच्या भेटीला आले आहे. मात्र, त्याची ओळख केवळ मनोरंजनापुरती मर्यादित न ठेवता, स्वच्छता, संवेदनशीलता, मैत्री, शिस्त, इतरांचा विचार आणि सार्वजनिक जबाबदारी यांसारखी मूल्ये मुलांपर्यंत सहज पोहोचवण्याचा अनोखा प्रयोग पुण्यात करण्यात आला.

शिवाजीनगर येथील भालेराव टॉवर येथे आयोजित विशेष कौटुंबिक कार्यक्रमाला १०० हून अधिक पालक, मुले तसेच भारत-जपान क्षेत्राशी जोडलेले नागरिक सहभागी झाले. विविध खेळ, संवादात्मक उपक्रम, जपानी संस्कृतीची ओळख आणि छायाचित्रण उपक्रमांमुळे कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

एफटीबी कम्युनिकेशन्स प्रायव्हेट लिमिटेडच्या पुढाकारातून आयोजित



करण्यात आलेल्या या उपक्रमामागे जपानमधील उत्तम कथा, पात्रे आणि सकारात्मक सांस्कृतिक मूल्ये भारतीय मुलांपर्यंत त्यांच्या परिचित भाषेत पोहोचवण्याचा व्यापक विचार आहे. या कार्यक्रमाची संकल्पना आणि नियोजन शर्वरी शिराळकर यांनी केले. त्या म्हणाल्या, "मुलांना उपदेश करण्याऐवजी त्यांच्या आवडत्या पात्राच्या कृतीतून चांगल्या सवयी, संवेदनशीलता आणि जबाबदारी समजली, तर ती मूल्ये त्यांच्या मनात अधिक सहज रुजू शकतात. आज मुलांना आवडणारी पात्रे उद्या ते कसे नागरिक बनतील, यावर सकारात्मक प्रभाव टाकू शकतात का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे." कार्यक्रमाला जपानी भाषेच्या शिक्षिका अंजनी पंचभाई, जपानी भाषा तज्ज्ञ विद्या आढाव आणि रूपाली काळे, तसेच अनेक वर्षांपासून जपानबरोबर काम करणारे वरिष्ठ व्यावसायिक रवी रासाळ आणि सैजश अशोकन यांची उपस्थिती लाभली. बोनोबोनो हे जपानी मांगा आणि ॲनिमेशनमधील लोकप्रिय समुद्री ऊद पात्र असून, त्याचा निरागसपणा, कुतूहल, मैत्री आणि संवेदनशीलता मुलांना सहज आपलासा वाटतो. जपानमध्ये मुलांसाठी अनेक दर्जेदार ॲनिमे, कथा आणि अर्थपूर्ण पात्रांची समृद्ध परंपरा आहे. मात्र, त्यातील मोजकीच पात्रे आजवर भारतीय मुलांपर्यंत पोहोचली आहेत. हीच दरी भरून काढण्याच्या उद्देशाने जपानमधील दर्जेदार ॲनिमे, दूरचित्रवाणी कार्यक्रम आणि दृक्-श्राव्य सामग्री भारतीय प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न केला जात आहे. रिआन व्यासपीठ वेगवेगळ्या भाषेतील कथा भारतीय भाषांमध्ये उच्च दर्जाच्या आवाज रूपांतर आणि स्थानिकीकरणाच्या माध्यमातून मुलांपर्यंत पोहोचवण्यासाठी काम करत आहे. त्यामुळे मनोरंजनासोबत त्या कथांमधील सकारात्मक मूल्येही मुलांच्या परिचित भाषेत पोहोचू शकतील.

केवळ भाषांतर न करता मूळ पात्रांचा स्वभाव, भावना, विनोद आणि सांस्कृतिक संदर्भ जपत भारतीय प्रेक्षकांसाठी नैसर्गिक अनुभव निर्माण करण्यावर भर दिला जात आहे. बोनोबोनो हा या प्रवासाचा पहिला टप्पा असून, भविष्यात आणखी दर्जेदार जपानी पात्रे आणि कथा भारतीय भाषांमध्ये मुलांपर्यंत पोहोचवणे, कौटुंबिक कार्यक्रम आयोजित करणे आणि शाळांशी संवाद साधणे, अशी व्यापक संकल्पना आहे.

या उपक्रमामागील भूमिका शर्वरी शिराळकर यांनी स्पष्ट करताना सांगितले की, "मुलांना मूल्यांवर आणखी एक धडा देण्याची गरज नाही; अनेकदा त्यांना फक्त असे एक पात्र हवे असते, जे त्यांना आवडते आणि जे आपल्या वागण्यातून ती मूल्ये दाखवते."

## थोडक्यात पण महत्वाचे



### ठाकरेंच्या शिवसेनेला मोठा धक्का, शिंदेंच्या खासदारांना त्याहून मोठा धक्का...!

धाराशिव/ दै. संध्या

जिल्ह्यात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना पक्षाला भाजपने मोठा राजकीय धक्का दिला आहे. कळंब नगरपालिकेतील शिवसेना ठाकरे गटाच्या तब्बल १० नगरसेवकांनी भाजपमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. तुळजापूरचे भाजप आमदार राणा जगजीतसिंह पाटील यांच्या पुढाकाराने सोलापूर येथे भाजप प्रदेश नेतृत्वाच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडत आहे. ऐन स्थानिक राजकीय घडामोडींच्या काळात खासदार ओमराजे निंबाळकर यांच्या बालेकिल्ल्यातच भाजपने खिंडार पाडल्याने राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे. या मोठ्या पक्षप्रवेशावर बोलताना आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांनी ठाकरे गटावरील टीकेपेक्षा विकासाचा मुद्दा अधोरेखित केला. "हा कोणालाही धक्का नसून कळंब शहर आणि संपूर्ण धाराशिव जिल्ह्याच्या विकासासाठी झालेला निर्णय आहे. जे नगरसेवक भाजपमध्ये येत आहेत ते माझे जुनेच सहकारी आहेत," असे पाटील म्हणाले. "जसे खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील हे माझे एकेकाळचे जुने सहकारी होते, तसेच हे नगरसेवकही जुने सहकारी आहेत. जिल्ह्याच्या विकासासाठी आम्ही एकत्र येत आहोत. याला 'ऑपरेशन लोटस' किंवा 'ऑपरेशन टायगर' म्हणण्याची गरज नाही. आमचे 'कमळ' (भाजप विस्तार) ही सातत्याने चालणारी निरंतर प्रक्रिया आहे." भाजपचे ज्येष्ठ नेते बसवराज पाटील यांच्याशी असलेल्या कथित मतभेदांवर बोलताना ते म्हणाले, "बसवराज पाटील हे ज्येष्ठ नेते असून त्यांच्यावर पक्षाने लातूरची मोठी जबाबदारी दिली आहे. भाजपमध्ये कोणतेही गट-तट नाहीत. काही कार्यक्रमांना वेळेअभावी उपस्थित राहता येत नसेल, परंतु आमच्यात कोणताही दुरावा नाही." कळंब नगरपालिकेतील १० नगरसेवकांनी एकाच वेळी पक्षांतर केल्याने ठाकरे गटाची पालिकेतील ताकद लक्षणीयरीत्या कमी झाली आहे. धाराशिव जिल्ह्यात खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार राणाजगजीतसिंह पाटील यांच्यातील राजकीय संघर्ष सर्वश्रुत आहे. अशा स्थितीत नगरसेवकांना भाजपमध्ये खेचून आणत आमदार राणा पाटलांनी स्थानिक पातळीवर पुन्हा एकदा आपले वर्चस्व सिद्ध केले आहे.

### मृत्युपूर्वी पोलीस पतीच्या त्रासाबद्दल सांगितली होती आपबीती

सोलापूर / दै. संध्या

तालुका पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या पोलिस कॉन्स्टेबलच्या पत्नीने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली. विवाहित महिलेने बहीण व आईसोबत फोनवर बोलून पतीच्या त्रासाबद्दल रडून रडून आपबीती सांगितली आणि आयुष्य संपवले. याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल वैभव श्रीधर सूर्यवंशी (रा. मु. पो. हराळी, ता. लोहारा) याच्याविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १५ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता मृत आकांक्षा हिने तिची बहीण पियुषा हिला फोन करून रडत-रडत आपल्यावर होणाऱ्या त्रासाची माहिती दिली होती. मला तुझे तोंड बघू वाटत नाही मयत आकांक्षाने तिच्या आई बहिणीला होत असलेल्या त्रासाबद्दल कॉल करून सांगितले होते. 'तुझे भावजी मला काही एक कळत नाही, तुझे शिक्षण कमी आहे, तुला रुपये कमवायची अक्कल नाही, तू मला फोन करत जाऊ नकोस. तुझ्यामुळे मी प्रत्येक गोष्टीत हरत चाललो आहे, मला यश येत नाही, मला तुझे तोंड बघू वाटत नाही', असे सांगून पती त्रास देत असल्याचे आकांक्षाने बहिणीला सांगितले. 'निलंगा येथील जागा विकून आपल्यावर झालेले कर्ज फेडण्यासाठी माहेरहून पैसे घेऊन ये', अशी मागणी करत पती मानसिक व शारीरिक छळ आरोपी करत होता, असा आरोपही तिने केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेनंतर बहीण पियुषा व तिच्या आईने कॉन्फरन्स कॉलवरून आकांक्षा हिची समजूत काढण्याचा प्रयत्न केला, मात्र, पतीच्या सततच्या छळाला कंटाळून आकांक्षाने टोकाचे पाऊल उचलले. याप्रकरणी मृत आकांक्षा हिची बहीण पियुषा व्यंकटराव मुदगले (वय २३, रा. कोथरूड, पुणे) हिने फिर्याद दिली. आकांक्षा वैभव सूर्यवंशी (वय २८, रा. न्यू पाच्छा पेठ) असे मृत विवाहितेचे नाव आहे. १६ ऑगस्ट रोजी सकाळी १०:२८ वाजण्याच्या सुमारास आकांक्षा राहत असलेल्या घरच्या मालकिणीने तिच्या बहिणीला फोन करून आकांक्षाने गळफास घेतल्याची माहिती दिली. पती वैभव सूर्यवंशी याच्या मानसिक, शारीरिक आणि आर्थिक त्रासाला कंटाळूनच आकांक्षा हिने आत्महत्या केल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

### "माझ्याकडे तुझे व्हिडिओ आहेत", ब्रेकअप होताच प्रियकराची धमकी

सोलापूर / दै. संध्या

लग्नाचे आमिष दाखवून तरुणीसोबत अत्याचार केला. पुढे ब्रेकअप झाल्यानंतर लॉजवरील खासगी व्हिडिओ व्हायरल करण्याची धमकी देत पुन्हा अत्याचार केल्याची घटना तुळजापूर आणि एका लॉजवर घडली. या प्रकरणी पीडितेने भिवंडी पोलिसांनी नितीन यादगिरी (३०) याच्याविरुद्ध फिर्याद दिली असून हा गुन्हा सोलापूर येथील फौजदार चावडी पोलिस ठाण्यात २० ऑगस्ट रोजी वर्ग करण्यात आला आहे. पीडित तरुणी आणि आरोपी नितीन यांची २०२५ मध्ये ओळख झाली होती. पुढे या ओळखीचे रूपांतर प्रेमात झाले. १५ ऑगस्ट २०२५ रोजी आरोपीने तरुणीला भिवंडी येथून सोलापूरला बोलावून लॉजवर नेऊन तिच्याशी संबंध ठेवले. त्यानंतर काही काळाने दोघांमध्ये बिनसल्याने ब्रेकअप झाले होते. दरम्यान, १५ ऑगस्ट रोजी पीडित तरुणी तिच्या कुटुंबासह तुळजापूर येथे दर्शनासाठी आली होती. ही गोष्ट समजताच आरोपी नितीन यादगिरी याने तिला फोन करून, "माझ्याकडे तुझ्या लॉजवरील व्हिडिओ आहेत, तू माझ्यासोबत ब्रेकअप करू नकोस," अशी धमकी दिली. त्यानंतर १६ ऑगस्ट रोजी आरोपीने तरुणीला तुळजापूर येथील एका धर्मशाळेच्या रूममध्ये बोलावून घेत तिच्या इच्छेविरुद्ध जबरदस्तीने अत्याचार केला, असे फिर्यादीत म्हटले आहे.

### जावलीचे ठरावधारक सहलीवर; तरीही फुटीची धास्ती

मेढा :/ दै. संध्या

गत निवडणुकीत मंत्री शिवेंद्रसिंहराजे गटाकडे पुरेसे ठरावधारक असतानाही राष्ट्रवादीचे शशिकांत शिंदे यांचा अवघ्या एका मताने निसटता पराभव झाला होता. त्यामुळे पुन्हा दगाफटका होऊ नये, यासाठी राजे गटाने खबरदारी घेऊन ठरावधारकांना भारतदर्शन सहलीवर पाठवल्याची चर्चा आहे. दरम्यान, पराभवाची परतफेड करण्यासाठी शिंदे गटानेही कंबर कसल्यामुळे जावळीचे राजकारण तापले आहे. यातून आरोप-प्रत्यारोप आणि परस्पर विरोधी गुन्हे दाखल करण्याचे सत्र सुरू आहे. जावलीतून यापूर्वी बाबूराव वारागडे, भिकू बापू धनावडे, लालसिंगराव शिंदे, राजेंद्र शिंदे, सुनेत्रा शिंदे, शशिकांत शिंदे आदींनी जिल्हा मध्यवर्ती बँकेत तालुक्याचे नेतृत्व केले.

# आंदोलन पुणे जिल्ह्यात झळ मात्र सातारा जिल्ह्याला

■ शिरवळ (दै. संध्या)

पुणे जिल्ह्यातील भोंगवलीसह ११६ गावांना भेडसावणाऱ्या ७६५/४००/२२० के.व्ही.जी.आय.एस सब स्टेशन व टॉवर लाईनचा प्रस्ताव स्थगित करावा या मागणीसाठी भोर राजगड सब स्टेशन व टॉवर हटाव संघर्ष समिती यांच्यावतीने कापुरव्होळ याठिकाणी पुकारण्यात आलेल्या रास्ता रोकोच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांसह वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागला आहे. यामध्ये पुणे जिल्ह्यासह सातारा जिल्ह्यातील प्रशासनाने खबरदारीचा उपाय म्हणून आशियाई महाममार्ग ४८ वरील सातारा-पुणे व पुणे-सातारा वाहतूक सातारा जिल्ह्यातून व पुणे शहरातून वळविल्याने प्रवाशांना व वाहनचालकांना पर्यायी मार्गाचा अवलंब करीत तब्बल ४० ते ४५ किलोमीटरचा अधिक प्रवास करावा लागला.

पुणे जिल्ह्यात होऊ घातलेल्या ७६५/४००/२२० के.व्ही.जी.आय.एस.सब स्टेशन व टॉवर लाईनला राजगड व भोर तालुक्यातील ११६ गावातील नागरिकांनी विरोध दर्शवत आंदोलनाची भूमिका घेतली असून याकरिता भोर राजगड सब स्टेशन व टॉवर हटाव संघर्ष समितीची स्थापना माजी आमदार संग्राम थोपटे यांच्या नेतृत्वाखाली प्रस्तावाला शासनाने स्थगित करावे या मागणीसाठी आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. त्यानुसार कापूरव्होळ याठिकाणी प्रस्तावाला स्थगितीच्या मागणीसाठी आशियाई महामार्ग ४८ वर रास्ता रोकोचा इशारा दिल्यानंतर पुणे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या आदेशानुसार आशियाई महामार्ग ४८ वरील सातारा-पुणे व पुणे-सातारा अशी वाहतूक व्यवस्था पुणे शहर व सातारा जिल्ह्यातून पर्यायी मार्गाने वळविण्यात आल्याने प्रवाशी व वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागला. यावेळी रविवार असल्याने पर्यटन स्थळाकडे जाणाऱ्या पुणे-मुंबई येथील प्रवाश्यांना पुणे जिल्ह्यातून व सातारा जिल्ह्यातून तब्बल ४० ते ४५ किलोमीटरचा अधिक प्रवास करावा लागल्याने व पर्यायी मार्गावरही वाहतूक कोंडीचा सामना करावा लागल्याने प्रवाशी व वाहनचालक हतबल झाले होते. यावेळी पुणे अपर पोलीस अधिक्षक गणेश बिरादार, सारोळा महामार्ग पोलीस मदत केंद्राचे सहाय्यक पोलीस निरीक्षक हणमंत पडळकर तसेच सातारा जिल्ह्यात शिरवळ पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश इंगळे, खंडाळा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप तसेच भुईंज महामार्ग पोलीस मदत केंद्राचे पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी महामार्गावर वाहतूक कोंडी टाळण्यासाठी जय्यत तयारी करीत महामार्गावर केसुर्डी, खेड शिवापूर टोलनाका तसेच अनेक ठिकाणी जड वाहतूक थांबविल्याने वाहतूक कोंडी सुटण्यास लवकर मदत झाली. दरम्यान, प्रकल्प स्थगितीसाठी सकाळी १० च्या दरम्यान सुरु झालेले आंदोलन तब्बल ३ तासाहुन अधिक आंदोलकांकडून आशियाई महामार्गावर रास्ता रोको केल्याने वाहतुकीचा बोजवारा उडाला होता. यामध्ये प्रवाशांसह वाहनचालकांना तब्ब्ल तीन तास ताटकळत बसावे लागले. या आंदोलनामध्ये खासदार सुप्रिया सुळे, माजी आमदार संग्राम थोपटे, पुणे जिल्हा बँक संचालक भालचंद्र जगताप, जिल्हा परिषद सदस्य पोपट सुके, माजी जिल्हा परिषद सदस्य कुलदीप कोंडे यांच्यासह शेतकरी बांधव सहभागी झाले होते.

दरम्यान, पोलीस प्रशासनाकडून करेक्ट कार्यक्रम. पुणे जिल्ह्यात होणाऱ्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर आशियाई महामार्गवर येणाऱ्या वाहतुकीचा ताण लक्षात घेऊन सातारा पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे, पुणे ग्रामीण पोलीस अधिक्षक संदीपसिंह गिल, पुणे महामार्ग पोलीस मदत केंद्राचे पोलीस अधिक्षक डॉ. शिवाजी पवार यांनी वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी महामार्ग पोलीस, स्थानिक पोलीस यांचा योग्य समन्वय साधत पर्यायी मार्गावर वाहतूक वळविल्याने आशियाई महामार्गवर वाहतुकीचा खोळंबा जास्त प्रमाणात न होता कमी वेळामध्ये वाहतूक सुरळीत होण्यास मदत झाली. त्यामुळे आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस प्रशासनाने केलेल्या करेक्ट कार्यक्रमाची चर्चा आंदोलनस्थळी सुरु होती.



## आईच्या बँक खात्याचा आधार घेत व्यावसायिकांना ३९ कोटींचा गंडा

■ अहिल्यानगर (दै. संध्या)

गुन्हेगार गुन्हा करताना आई-वडिलांचे नावे लपवतात, मात्र फायनान्स कंपनीच्या व्यवस्थापकाने फसवणुकीसाठी आईच्या बँक खात्याचा वापर केल्याचे तपासात उघड झाले आहे. व्यावसायिकांना तब्बल ३९ कोटींचा गंडा घातल्याचे समोर आले आहे. आरोपींची मालमत्ता जप्त करून व्यावसायिकांचे पैसे परत करण्याची मागणी फिर्यादीच्या वकिलांकडून करण्यात आली आहे.

व्यावसायिकांची आर्थिक फसवणूक केल्याप्रकरणी अटकेत असलेल्या राहुल जगताप व त्याची पत्नी एंजल राहुल जगताप ऊर्फ पायल प्रवीण सॅम्युअल यांचे अनेक कारनामे पोलिस तपासात समोर आले आहेत. जगताप पती-पत्नीने जास्तीचा नफा देण्याचे आमिष दाखवीत बड्या व्यावसायिकांना जाळ्यात ओढले. त्यांनी अहिल्यानगर शहरासह मुंबई, ठाणे, दिल्ली, भोपाळ येथील व्यावसायिकांना फसवले असून, याप्रकरणी पती-पत्नीविरोधात १२ गुन्हे दाखल आहेत. आरोपी राहुल जगताप हा व्यावसायिकांना त्याची आई सुशिला जगताप हिच्या बँक खात्यात पैसे ट्रान्सफर करण्यास सांगायचा. व्यावसायिकांनी कोटचावधींची रक्कम सुशिला जगताप यांच्या खात्यात ट्रान्सफर केल्याचे उघड झाले असून, चार वर्षात सुशिला जगताप यांच्या विविध बँकांच्या पाच खात्यात फसवणुकीचे ३९ कोटी रुपये जमा झाल्याचे समोर आले आहे. आरोपी व त्यांच्या नातेवाईकांनी संघटितपणे व्यावसायिकांची फसवणूक केली आहे. आरोपींविरोधात महाराष्ट्र ठेवीदारांचे संरक्षण (एमपीआयडी) कायद्यानुसार प्रस्ताव तयार करण्यात येणार असून, त्यांची मालमत्ता जप्त करण्याबाबत शासनाकडे परवानगी मागितली जाणार आहे. शासनाच्या परवानगीने आरोपींची मालमत्ता जप्त करण्यात येणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

आरोपी राहुल जगताप एका फायनान्स कंपनीत एरिया मॅनेजर होता. त्याला व्यावसायिकांचे आर्थिक व्यवहार माहिती होते. तो व त्याची पत्नी बड्या व्यावसायिकांना भेटून गुंतवणूक करण्यास सांगत होते. त्यांनी रिजॉईस इव्हेंट ऑर्गनायझेशन कंपनी स्थापन केली होती. या कंपनीत गुंतवणूक केल्यास १५ ते २० टक्के परतावा देतो, असे ते व्यावसायिकांना सांगायचे. व्यावसायिकांनी नफ्याच्या आमिषाने गुंतवणूक केली. आरोपींनी अहिल्यानगर शहरातील चार आरोपींची साडेनऊ कोटींची फसवणूक केली असून, तपासात आरोपीने आणखी लोकांची फसवणूक केल्याचे समोर आले आहे. फसवणुकीसाठी आरोपीने त्याच्या आईच्या खात्याचा वापर केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणाचा तपास करून दोषारोपपत्र लवकरच दाखल करण्यात येणार आहे, अशी माहिती तपास अधिकारी शिशिरकुमार देशमुख यांनी दिली.

## ग्रामपंचायत कोथळे, ता. पुरंदर, जि. पुणे

B-1 टेडर नोटीस क्र.१ सन २०२६/२७

ग्रामपंचायत कोथळे, ता. पुरंदर, जि पुणे यांचेकडुन खालील नमूद केलेल्या कामांची निविदा B-1 निविदा पद्धतीने (दोन सीलबंद लिफाफा पद्धतीने जिल्हा परिषद कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून मागविण्यात येत आहेत. कोऱ्या निवेदेचा नमुना ग्रामपंचायत कोथळे ता. पुरंदर जि. पुणे यांच्याकडुन दिनांक २५/०८/२०२६ ते दिनांक ०१/०९/२०२६ या कालावधीत कामकाजाच्या दिवशी सकाळी १० ते सायंकाळी ०६ वाजेपर्यत देण्यात येतील व पोस्टाने / समक्ष ग्रामपंचायत मध्ये स्वीकारले जातील सदर सीलबंद निविदा मासिक सभे दिवशी / ग्रामपंचायत सोई नुसार उघडण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | निवीदा विक्री करण्याचा कालावधी | निवीदा फी | इसारा रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | कोथळे येथे सिमेंट रस्ता करणे. | २१७१२८/- | दि २५/०८/२०२६ ते दि ०१/०९/२०२६ | २३६/- | २१७१/- |
| २ | प्राथमिक शाळा येथे पेव्हर ब्लॉक बसवणे. | १९९५१०/- | | २३६/- | १९९५/- |

**निविदेच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे :** १. कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे चा अधिकार ग्रामपंचायतीने राखुन ठेवला आहे. २. कोऱ्या निविदा फी व इसारा रक्कम ग्रामपंचायत कोथळे PDCC बँक शाखा जेजुरी खाते क्र. ०२६००२५००००००१७ वर किंवा ग्रा.प. कार्यालयात रोख भरल्या नंतर उपलब्ध होतील. तसेच निविदा भरणे कामी आवश्यक अटी व शर्ती सोबत दिल्या जातील. ३.जि.प. रजिस्ट्रेशन, PAN कार्ड, GST certificate व या पूर्वी केलेल्या कामांचे काम पूर्णत्वाचे दाखले जोडावेत. सदर निविदा बाबत कोणताही वाद उत्पन्न झाल्यास निविदा रद्द करणेचा, कोणतीही निविदा स्विकारणेचा अथवा नाकारणेचा सर्व अधिकार ग्रामपंचायत कोथळे यांनी राखुन ठेवला आहे.


सरपंच ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचायत कोथळे ता. पुरंदर जि. पुणे

# अस्तित्वाच्या लढाईसाठी ५५० किमीचा प्रवास!

## यवतमाळच्या टिपेश्वरमधून निघालेला वाघ बीड जिल्ह्यात

■ कडा (दै. संध्या)

यवतमाळच्या टिपेश्वर वन्यजीव अभयारण्यातील तीन वर्षीय नर वाघाने अन्न व नवीन क्षेत्राच्या शोधात तब्बल ५५० किलोमीटरचा प्रदीर्घ प्रवास केला आहे. हा वाघ आष्टी वनपरिक्षेत्रातील देवळाली-वेलतुरीच्या जंगलात सुरक्षितपणे स्थायिक झाला असल्याची माहिती वन विभागाने दिली आहे. वाघाची ही अविश्वसनीय भ्रमंती वन्यजीव अभ्यासकांचे लक्ष वेधून घेत आहे.



यवतमाळच्या टिपेश्वर अभयारण्यात 'टी-२२' या वाघिणीच्या पोटी २०२२ मध्ये सदरील वाघाचा जन्म झाला होता. नवीन अधिवासाच्या शोधात तो डिसेंबर २०२४ मध्ये धाराशिवच्या येडशी येथील रामलिंग अभयारण्यात आला. त्यानंतर, वाघाने बार्शी, धाराशिव, सोलापूर, लातूर आणि अहिल्यानगर येथील कर्जत परिसरात भ्रमंती केली. फेब्रुवारी २०२५ मध्ये कर्जत जि. अहिल्यानगर येथे त्याला पाहिले गेले. पाच महिन्यांच्या अदृश्यतेनंतर ३ ऑगस्ट रोजी आष्टी तालुक्यातील देवळाली-वेलतुरीच्या जंगलात त्याच्या खुणा आढळून आल्या. देवळाली पानाची येथे एका जनावराचा फडशा पाडल्यानंतर वन विभागाच्या लक्ष्यावर असलेल्या या वाघाने १३ ऑगस्टला ब्रह्मगाव येथेही हल्ला केला. तत्पूर्वी, त्या परिसरातील हालचालींची नोंद घेण्यासाठी वन विभागाने ट्रॅप कॅमेरे बसवले होते. आणि अखेर, २० ऑगस्ट रोजी कॅमेऱ्यात कैद झाला तो पट्टेदार वाघ तीन वर्षे आठ महिन्यांचा होता.

वाघाचा हा प्रवास कसा झाला? - धाराशिव ते येडशी: १९ किमी - धाराशिव ते सोलापूर: ६६ किमी - धाराशिव ते लातूर: ८० किमी - धाराशिव ते अहिल्यानगर: २१२ किमी- धाराशिव ते आष्टी: १३६ किमी सदरील वाघ तब्बल ५५० किलोमीटर अंतर कापून बीड जिल्ह्यातील आष्टी येथे आला आहे. धाराशिव, सोलापूर, लातूर, अहिल्यानगर आणि बीड या पाच जिल्ह्यात भटकंती करताना तो स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याच्या शोधात आहे. अजूनही योग्य क्षेत्र न मिळाल्यामुळे तो सतत भ्रमंती करत आहे.

## जाहीर नोटीस

तमाम लोकास कळविणेत येते की, खालील पराशिष्टात वर्णन केलेल्या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक महिपत वामन मुळे यांचे मालकी ताबेवहिवाटीची असून सदर मालक व आमचे आशिलांदरम्यान सदर मिळकत खरेदी करणेबाबत बोलणी चालु आहे सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व बोजाविरहीत असून त्यामध्ये इतर कुणाचा ताबा, गहाण, दान, लीन, बैंक बोजा, कुळ वहिवाट, लेखी व तोंडी करार अॅटॅचमेंट, हक्क, पोटगी हक्क, विसारपावती, साठेखत, खरेदीकरार, बक्षीस, वारसा, कोर्ट केसेस, मुखत्यारपत्र अगर रस्त्यांचा कोणत्याही प्रकारचा हक्क वा आधिकार नाही अशी खात्री व भरवसा सदर मालकांनी आमचे आशिलास दिलेला आहे. तथापि सदर मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास या नोटीशीने प्रसिध्दीपासून १० (दहा) दिवसांचे आत मुळ कागदपत्रानिशी आमची खात्री करून दयावी. मुदतींमध्ये हरकत न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचा कोणत्याही प्रकारचा काही एक हक्क, आधिकार व हितसंबंध नाही आणि असल्यास तो त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजुन आमचे आशिल ठरलेप्रमाणे पुढील व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाहय हरकत विचारात घेतली जाणार नाही.

परिशिष्ट मिळकतः- तुकडी व जिल्हा पुणे, पो.तु.ता.जुन्नर, मा. दुय्यम निबंधक सो. नारायणगाव यांचे हद्दीतील व पंचायत समिती जुन्नर व जिल्हा परिषद पुणे यांचे हद्दीतील तसेच गाव व ग्रामपंचायत मांजरवाडी हद्दीतील खाते क. १७६६ वरील जमीन मिळकत खालीलप्रमाणे:

१) गट नं. २६९ यासी क्षेत्र ० हे. ४५ आर, आकार ०.५३ पैसे पैकी महिपत वामन मुळे यांचे हिश्याचे क्षेत्र ० हे.३४ आर, आकार ०.४० यासी चतुःसीमा पुर्व बबन दगडु मुळे यांचे क्षेत्र, पश्चिम सुप्रिया गणेश तांबे यांचे क्षेत्र, दक्षिण सुप्रिया गणेश तांबे यांचे क्षेत्र, मारूती वामन मुळे, उत्तर सुप्रिया गणेश तांबे यांचे क्षेत्र

येणेप्रमाणे मिळकत हा या जाहीर नोटीसचा विषय आहे.

खरेदी घेणार तर्फे
श्री. श्रीनिवास डी. हांडे
अॅडव्होकेट फुलसुंदर मार्केट,
नारायणगाव ता.जुन्नर जि. पुणे
मो.नं. ९७३०४९३२३६

नारायणगाव
दि.२५/०८/२०२६
येणेप्रमाणे जाहीर नोटीस

## शनिदेवाच्या मूर्तीला बनावट तेलाचा अभिषेक?

■ सोनई (दै. संध्या)

श्री क्षेत्र शनिशिंगणापूर येथे शनि चौथऱ्यावर शनिमूर्तीवर वाहण्यासाठी भेसळयुक्त तेलाची विक्री होत असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकाराची तातडीने चौकशी करून संबंधित विक्रेत्यांवर कारवाई करावी, अशी मागणी राष्ट्रीय श्रीराम संघाच्या वतीने करण्यात आली आहे. याबाबत अमोल वाढेंकर, लखन ढगे, अर्जुन महाले व संतोष डांगे यांनी देवस्थानचे कार्यकारी अधिकारी अतुल चोरमारे यांच्याकडे निवेदन देऊन तक्रार केली. शनिशिंगणापूर येथे दररोज मोठ्या संख्येने भाविक येतात. शनिमूर्तीवर तेल वाहण्याची परंपरा असल्याने तेलाची खरेदी केली जाते. या प्रकारामागे मोठे रॅकेट असण्याची शक्यताही तक्रारदारांनी व्यक्त केली आहे. भाविकांच्या श्रद्धेचा गैरफायदा घेऊन निकृष्ट अथवा बनावट तेलाची विक्री करणाऱ्यांची चौकशी करून दोष आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करावी. अशा विक्रेत्यांची दुकानदारी बंद करून भाविकांची फसवणूक थांबवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष
फेर निविदा जाहिरात
टेंडर नोटीस

विक्री कालावधी दिनांक : २२/०८/२०२६ ते २९/०८/२०२६ २.३० पर्यंत
विक्री कालावधी दिनांक : २२/०८/२०२६ ते २९/०८/२०२६ २.३० पर्यंत
तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : ३१/०८/२०२६ दुपारी ०३:०० वाजता

| निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव/संपुर्ण तपशील | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम | कामाची मुदत (महिने) | अडचण आल्यास निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC/WATER_SUPPLY/2026/112 | पाणीपुरवठा विभाग | स्वारगेट पाणीपुरवठा कार्यकारी अभियंता क्र. २ अंतर्गत येणाऱ्या प्रभागांमध्ये टँकरणे पाणीपुरवठा करणे. | रू. ४१५/- | रू. ९९९७७५/- | रू. ९९९८/- | १२ | श्री. किरण देसले ९६८९९३८३०४ |

अ) सदर कामांबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.

ब) निविदा प्रक्रियाच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.

क) ऑनलाईन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.

ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
कार्यकारी अभियंता
स्वारगेट जलकेंद्र विभाग
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्रमांक : २/६१८ दि. २१/०८/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे



### गणेशोत्सवानिमित्त वल्लभनगर आगारातून कोकणात जादा एसटी बस सोडाव्यात

**पिंपरी : दैनिक संध्या**

आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन कोकण खेड युवाशक्ती सामाजिक संस्था यांच्या वतीने वल्लभनगर आगार, पिंपरी-चिंचवड येथे जादा एस.टी. बसगाड्या सोडण्याबाबत निवेदन देण्यात आले. निवेदनामध्ये गणेशोत्सवासाठी कोकणवासीयांना त्यांच्या गावी जाण्यासाठी अधिक बससेवा उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली. तसेच खेड तालुक्यातील वडगाव मार्गावरील बससेवा पुन्हा सुरू करावी आणि चोरवणे मार्गासाठी विशेष जादा बसगाड्यांची व्यवस्था करावी, अशी मागणीही करण्यात आली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष संतोष कदम, सचिव नंदकुमार महाडिक, कार्याध्यक्ष अंकुश चव्हाण, मार्गदर्शक गजानन भाऊ मोरे, उद्योजक ज्ञानेश्वर कदम, माजी अध्यक्ष संदीप साळुंखे, रुपेश मोरे, सुरज उतेकर आदी मान्यवर उपस्थित होते. निवेदन स्वीकारताना वल्लभनगर आगार प्रमुखांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून गणेशोत्सवानिमित्त जादा बसगाड्या उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक प्रयत्न करण्यात येतील, असे आश्वासन दिले. या मागणीमुळे गणेशोत्सवासाठी कोकणात जाणाऱ्या हजारो प्रवाशांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### अत्याधुनिक तंत्रज्ञानातून ‘चांगल्या डिजिटल जगाची’ निर्मिती करा

**पिंपरी : दैनिक संध्या**

उपग्रह तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, मशीन लर्निंग आणि क्वांटम तंत्रज्ञान ही भविष्यातील डिजिटल जगाची महत्त्वाची क्षेत्रे आहेत. या अत्याधुनिक तंत्रज्ञानातून ‘चांगल्या डिजिटल जगाची’ निर्मिती करावी. भारताने या क्षेत्रांमध्ये आत्मनिर्भरतेच्या दिशेने वेगाने वाटचाल करणे आवश्यक आहे. एनएवीएलसी सारख्या स्वदेशी तंत्रज्ञानामुळे दळणवळण, नेव्हिगेशन आणि संरक्षण क्षेत्राला मोठी ताकद मिळते. भविष्यात स्मार्टफोन पासून उपग्रह संप्रेषण पर्यंत तंत्रज्ञान अधिक सक्षम आणि सर्वव्यापी होईल. या परिवर्तनात भारतातील तरुण संशोधक महत्त्वाची भूमिका बजावतील अशी अपेक्षा स्पेस एप्लिकेशन्स सेंटर अहमदाबाद चे माजी संचालक डॉ. निलेश देसाई यांनी व्यक्त केली. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या आकुर्डी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथे ‘चांगल्यासाठी तंत्रज्ञान: एक उत्तम डिजिटल जगाची उभारणी’ या विषयावर आधारित १० व्या आयइइइ संगणक संचार नियंत्रण आणि स्वचालन २०२६ (आयसीसीयूबीइए) सिग्नल प्रोसेसिंग सोसायटी पुणे चॅप्टर यांच्या सहकार्याने दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी निलेश देसाई बोलत होते. यावेळीआयसीसीयूबीइए २०२६ च्या स्मरणिकेचे अनावरण करण्यात आले.यावेळी बिर्ला इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड सायन्स (बीआयटीएस) पिलानी समूह कुलगुरू डॉ. व्ही. रामगोपाल राव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता (प्रभारी) डॉ. रावसाहेब लटपटे, आयइइइ पुणे सेक्शनचे प्रतिनिधी डॉ. मंदार भवाळकर, पीसीसीओइ चे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीइटी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट सेलचे अधिष्ठाता डॉ. शितलकुमार रवंदळे, आयसीसीयूबीइए २०२६ च्या जनरल चेअर डॉ. सोनाली पाटील, व्हा. जनरल चेअर डॉ. वर्षा के. हरपळे, प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी आदी उपस्थित होते. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेसाठी भारत आणि परदेशातून एकूण २,२६३ संशोधन प्रबंध प्राप्त झाले, त्यापैकी २३८ संशोधन प्रबंधांचे या परिषदेत सादरीकरण केले. अत्याधुनिक तंत्रज्ञान, संगणकशास्त्र, कम्युनिकेशन, कंट्रोल, ऑटोमेशन, कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच भविष्यातील डिजिटल तंत्रज्ञानातील संशोधन व नव कल्पनांवर चर्चा सत्र करण्यात आली. डॉ. व्ही. रामगोपाल राव म्हणाले की, आयसीसीयूबीइए च्या दहाव्या आवृत्तीपर्यंतचा प्रवास ही पीसीसीओइ च्या संशोधन, नवोन्मेष आणि शैक्षणिक गुणवत्तेची महत्त्वपूर्ण नोंद आहे. तंत्रज्ञानातील प्रगतीसोबतच त्याचा उपयोग समाजाच्या हितासाठी होणे आवश्यक आहे. संशोधक, विद्यार्थी, शैक्षणिक संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे संशोधनाला व्यावहारिक स्वरूप मिळते. डॉ. रावसाहेब लटपटे यांनी सांगितले की, तंत्रज्ञान अधिक प्रगत होत असताना त्याचा केंद्रबिंदू मानव आणि समाजहित असणे आवश्यक आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑटोमेशन, कम्युनिकेशन आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा विकास हा जबाबदार, सुरक्षित, सर्वसमावेशक आणि शाश्वत असला पाहिजे. डॉ. मंदार भवाळकर यांनी सांगितले की, यावर्षी २,२६३ संशोधन निबंध प्राप्त होणे आणि कठोर समीक्षा प्रक्रियेनंतर निवडक संशोधन निबंधांचे सादरीकरण होणे, हे परिषदेची गुणवत्ता आणि जागतिक स्वीकारार्हता दर्शवते. आयसीसीयूबीइए २०२६ च्या जनरल चेअर डॉ. सोनाली पाटील यांनी परिषदेची भूमिका व उद्दिष्टे स्पष्ट केली. स्वागत पीसीसीओइ चे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. सोनल शिर्के यांनी आणि आभार डॉ. वर्षा हरपळे यांनी मानले.

### सोनकर प्रकरणात पुणे पोलीस आयुक्तांना दणका; एनसीएससी आयोगाकडून नोटीस

**पिंपरी : दैनिक संध्या**

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 338 अंतर्गत स्थापन झालेल्या राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाने (एनसीएससी) समाजसेवक व उद्योजक धर्मेंद्र (बबलू) सोनकर यांच्या तक्रारीची गंभीर दखल घेत पुणे पोलीस आयुक्तांना नोटीस बजावली आहे. आयोगाने 15 दिवसांच्या आत संबंधित प्रकरणातील पत्रव्यवहार व माहिती सादर करण्याचे निर्देश दिले आहेत. निर्धारित मुदतीत उत्तर न दिल्यास आयोग आपल्या घटनात्मक अधिकारांचा वापर करून संबंधित अधिकाऱ्यांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींना समन्स बजावून हजर राहण्याचे आदेश देऊ शकतो, असा इशाराही नोटिशीत देण्यात आला आहे. राष्ट्रीय अनुसूचित जाती आयोगाचे संचालक डॉ. सुनील कुमार बाबू यांनी 21 ऑगस्ट 2026 रोजी पुणे पोलीस आयुक्तांना ही नोटीस पाठविली असून आयोगाने या प्रकरणाची दलित अत्याचाराच्या अनुषंगाने चौकशी सुरू केली आहे. धर्मेंद्र सोनकर यांनी आयोगाकडे दिलेल्या तक्रारीत पुणे पोलीस विभागाकडून जातीय भेदभाव व छळ होत असल्याचा आरोप केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, 19 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी बंडगार्डन पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक अभिजीत चौगुले हे 4 ते 5 पोलिसांच्या पथकासह कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या निवासस्थानी आले होते. एका कथित खोट्या प्रकरणात अटक करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून ही कारवाई डीसीपी राजलक्ष्मी शिवशंकर यांच्या आदेशानुसार करण्यात आल्याचा दावा त्यांनी तक्रारीत केला आहे. सोनकर यांनी आपल्या निवेदनात नमूद केले आहे की, नोव्हेंबर 2021 मध्ये राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे (एनसीबीसी) तत्कालीन उपाध्यक्ष डॉ. लोकेश प्रजापती यांनी त्यांची महाराष्ट्र-गोवा राज्य प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केली होती. मात्र, पुणे पोलीस ही नियुक्ती बनावट असल्याचा दावा करीत आहेत. यापूर्वी पिंपरी-चिंचवड पोलीस ठाण्याने या नियुक्तीची चौकशी करून प्रकरण निकाली काढले असल्याचेही त्यांनी सांगितले. याच विषयावर पुणे पोलिसांनी त्यांच्या अधिकारक्षेत्राबाहेर जाऊन गुन्हा दाखल करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप करत, ही कारवाई केवळ कायदेशीर प्रक्रिया नसून जातीय ओळखीच्या आधारे दबाव आणण्याचा व छळ करण्याचा प्रयत्न असल्याचे सोनकर यांनी म्हटले आहे.



# आकुर्डी-निगडीत कचऱ्याचे साम्राज्य

**डासांचा उपद्रव वाढला, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर, ओला कचरा, वाढलेले गवत अन् दुर्गंधीने नागरिक त्रस्त; जंतुनाशक फवारणी आणि धुराळणी करण्याची मागणी**

■ आकुर्डी (दै. संध्या)

ओलसर कचरा, अडगळीच्या वस्तू यामुळे दत्तवाडी, आकुर्डी, विठ्ठलवाडी, निगडी प्राधिकरणात ठीकठिकाणच्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांमुळे, वाढलेल्या गवतामुळे परिसरामध्ये मोठ्या प्रमाणात डासांची पैदास झाली आहे. त्यामुळे रात्रंदिवस नागरिकांना या डासांचा त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे अनेक वेळा थंडी ताप, मलेरिया, डेंगू, चिकनगुनिया यासारख्या आजारांमुळे मुले, महिला व नागरिक त्रस्त आहेत. शहरातील कचरा समस्या गंभीर बनल्याने परिसरात कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. महापालिकेच्या नियोजनशून्य कारभाराचा नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे.

मोशी कचरा डेपो दुर्घटनेनंतर मोठ्या प्रमाणात महापालिकेच्या स्वच्छ व सुंदर शहराचा बोजवारा उडाला. परिसरात अनेक ठिकाणी योग्य पद्धतीने कचरा संकलन व स्थलांतरण झाल्याने शहरात सर्वत्र कचऱ्याचे ढिगारे त्यामुळे अस्वच्छता निर्माण झाली होती. या परिस्थितीमध्ये शहरभर मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने परिसरात ठिकठिकाणी साचलेला कचरा ओला झाल्यामुळे वेळेवर न उचलला गेल्याने दुर्गंधी व डासांची पैदास मोठ्या प्रमाणात झाली आहे.

यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. मात्र, प्रशासनाकडून याबाबत कोणतीही कार्यवाही न झाल्याने नागरिकांना दुर्गंधी व डासांचा त्रास सहन करावा लागत आहे. आरोग्य विभागाकडून जंतुनाशक फवारणीकडे काणाडोळा

पिंपरी चिंचवड महापालिका प्रशासनामार्फत कचऱ्याचे व्यवस्थापन होणे आवश्यक असतानाही. त्याची योग्य दखल न घेतल्याने ओल्या कचऱ्यामध्ये डासांची पैदास मोठ्या प्रमाणात झाली असून, परिसरात दुर्गंधीयुक्त वातावरण आहे. यातच पावसापूर्वी व आता जंतुनाशक फवारणी करणे आवश्यक असतानाही योग्य त्या पद्धतीने परिसरामध्ये फवारणी व धुराळणी होत नाही,

याबाबत आरोग्य विभाग व स्वच्छता विभागाने तात्काळ कार्यवाही करून भेडसावणारा आरोग्याचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा, अशी मागणी जनसामान्यातून होत आहे.

## ‘हाऊसफुल्ल’ तुकाराम मुंढे.. ‘भेसळमुक्त महाराष्ट्राचा निर्धार’

■ पिंपरी (दै. संध्या)

राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या प्रकट मुलाखतीच्या कार्यक्रमाला पिंपरी-चिंचवडकरांनी तुडुंब प्रतिसाद दिला. दिशा सोशल फाऊंडेशनच्या तीने शनिवारी (२२ ऑगस्ट) चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे नाट्यगृहात हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ‘भेसळमुक्त महाराष्ट्र, आरोग्यदायी महाराष्ट्र’ हा विषय केंद्रस्थानी ठेवून ज्येष्ठ पत्रकार मयुरेश कोण्णूर यांनी तुकाराम मुंढे यांच्याशी मनमोकळा संवाद साधला.



या कार्यक्रमात ‘नीट यूजी २०२६’ परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम आलेली श्रावणी कृष्णकांत कुदळे, जागतिक शूटिंग स्पर्धेतील रौप्यपदक विजेती खेळाडू शौर्या दिलीप भरणे आणि पूर्व उच्च माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत महाराष्ट्रात प्रथम क्रमांक मिळवलेला क्षितीजय प्रवीण नप्ते यांचा तुकाराम मुंढे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

शिक्षण संस्थेतील इयत्ता नववीची विद्यार्थिनी महक जमू जहागिरदार हिने तुकाराम मुंढे यांच्या प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वावर उत्स्फूर्त भाषण केले. पत्रकार शफी पठाण लिखित ‘तुकाराम’ या पुस्तकातील मजकुराचे श्रीकांत चौगुले यांनी अभिवाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक नाना शिवले यांनी केले. सानिका कांबळे हिने आभार मानले. या मुलाखतीत मुंढे यांनी, अन्नातील भेसळ, नागरिकांची जबाबदारी, नैतिकता, प्रशासनातील कार्यपद्धती, कर्तव्याला दिलेले महत्त्व आणि आतापर्यंतच्या प्रशासकीय प्रवासातील अनुभव अशा विविध मुद्द्यांवर परखड आणि अभ्यासपूर्ण मते व्यक्त केली.

तुकाराम मुंढे म्हणाले की.. झोपलेल्या व्यक्तीला जागं करता येतं. मात्र झोपल्याचं सोंग घेतलेल्या व्यक्तीला जागं करता येत नाही. ज्ञान आणि माहितीच्या बाबतीत आपण चिकित्सक असतो. मात्र, अन्नपदार्थांच्या बाबतीत तोच चिकित्सकपणा दिसत नाही. माणसाने शरीराने नव्हे तर वैचारिकदृष्ट्या देखील निरोगी असावे. भेसळ पदार्थांची असते. तशीच ती विचारांची देखील असते. प्रत्येकवेळी प्रवाहाच्या विरुद्ध जाणं, हे शहाणपणाचं नाही. मात्र, योग्य प्रवाह ओळखणे आवश्यक आहे. सध्याच्या डिजिटल युगात आपण काय ऐकतो, काय पाहतो, कोणते विचार आपल्यापर्यंत येतात आणि त्याचे आपण नेमके काय करतो हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. यापूर्वी माहिती मिळवण्यासाठी कष्ट पडत होते. आता तीच माहिती क्षणार्धात मोबाईलवर येते. यातील ‘अल्गोरिदम’मुळे दुसरी बाजू समोर येत नाही, ती समजून घेतली पाहिजे.

## पुत्रदा एकादशीनिमित्त माऊलींच्या संजीवन समाधी मंदिरात आकर्षक पुष्पसजावट

■ पिंपरी (दै. संध्या)

आळंदी (Pclive7.com):- पुत्रदा एकादशीनिमित्त आळंदी येथील जगद्गुरू संत ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधी मंदिरात आकर्षक आणि मनमोहक पुष्पसजावट करण्यात आली आहे. विविध रंगांच्या फुलांनी सजविण्यात आलेल्या मंदिर परिसरामुळे भाविकांना प्रसन्न आणि आध्यात्मिक वातावरणाचा अनुभव मिळत आहे.

एकादशीनिमित्त पहाटेपासूनच मंदिरात धार्मिक विधी, अभिषेक, पूजा-अर्चा तसेच भजन-कीर्तनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. हरिनामाच्या अखंड गजराने संपूर्ण आळंदी नगरी भक्तिमय वातावरणात रंगून गेली असून राज्याच्या विविध भागांतून आलेल्या हजारो भाविकांनी माऊलींच्या समाधीचे दर्शन घेत आशीर्वाद घेतले.

मंदिरातील रंगीबेरंगी फुलांची सजावट भाविकांचे विशेष आकर्षण ठरत असून सजावटीमुळे मंदिराच्या सौंदर्यात भर पडली आहे. या विशेष पुष्पसजावटीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची मोठी गर्दी होत आहे. पुत्रदा एकादशीच्या निमित्ताने आळंदीतील धार्मिक आणि आध्यात्मिक वातावरण अधिकच बहरले असून संत ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणी भक्तीभावाने नतमस्तक होण्यासाठी भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहत आहेत.

## ‘श्री झुलेलाल जो चालियो साहेब’ कार्यक्रम संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरीतील पवना नदी घाट परिसरातील बाबा छत्तुराम झुलेलाल मंदिर येथे गुरुवार, दि.२० ऑगस्ट रोजी ‘श्री झुलेलाल जो चालियो साहेब’ हा धार्मिक कार्यक्रम भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला.

श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्मिक वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमात सिंधी समाजातील भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला, अशी माहिती जगदीश लालचंदानी यांनी दिली.

# पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासात खान्देशी लोकांचा मोठा हातभार

■ पिंपरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड आणि पुणे परिसरात वास्तव्यास असलेल्या खानदेशवासीयांसाठी संस्कृती, परंपरा आणि धार्मिक सणाचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत अखंडितपणे पोहोचवण्याच्या उद्देशाने आयोजित तिसऱ्या ‘भव्य खान्देश सार्वजनिक कानबाई माता उत्सव २०२६’ च्या अंतर्गत आज अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात आगमन मिरवणूक व विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.

या महोत्सवाच्या प्रास्ताविकात संयोजन समितीचे प्रमुख नामदेव ढाके यांनी उपस्थितांचे स्वागत करून महोत्सवाच्या भूमिकेवर प्रकाश टाकला.

गावाकडून शहरामध्ये इतक्या मोठ्या प्रमाणात कानबाई महोत्सव साजरा होत असल्याबद्दल उपस्थितांनी मनमोकळा आनंद व्यक्त केला. आज पार पडलेल्या कानबाई उत्सवाच्या भव्य मिरवणुकीने संपूर्ण पिंपरी-चिंचवड नगरीत आनंदाचे व भक्तीमय वातावरण निर्माण केले होते.

कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे म्हणाले की, पुणे-पिंपरी-चिंचवड शहरांच्या विकासात खान्देशी लोकांचा मोठा हातभार आहे. एवढ्या दूर राहूनही आपल्या मातीची संस्कृती आणि परंपरा येथील खानदेशवासीयांनी अत्यंत उत्साहात कायम राखल्याचा आणि देश-विदेशातही हा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होत असल्याचा विशेष आनंद असल्याचे त्यांनी सांगितले. आज, रविवार (२३ ऑगस्ट) रोजी दुपारी तुळजाभवानी मंदिर, शिवनगरी, बिजलीनगर, चिंचवड येथून शुभम गार्डन, वाल्हेकरवाडीपर्यंत कानबाई माता आगमन भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत शिरपूरची प्रसिद्ध ‘गोल्डन बँड’ आणि अमळनेरची ‘राधेकृष्णा बँड’ विशेष आकर्षण ठरली. या मिरवणुकीत महिलांनी डोक्यावर कलश घेऊन तर पुरुषांनी पारंपरिक वेषात उत्स्फूर्त सहभाग घेतला. त्यानंतर सायंकाळी शुभम गार्डन, वाल्हेकरवाडी येथे देवीची स्थापना, कानबाई माता पूजन आणि उत्सव उद्घाटन सोहळा संपन्न झाला. याचवेळी मान्यवरांचा




सत्कार व मनोगताचा कार्यक्रम पार पडला. रात्री ८ वाजल्यापासून भाविकांसाठी मातांचे दर्शन व महाप्रसादाचा कार्यक्रम सुरू झाला. तसेच रात्री ८ ते १० या वेळेत खानदेश फ्रेंड सर्कल ग्रुप (शिरपूर, धुळे, पुणे) चे कलाकार तसेच लोकप्रिय गायक सागर देशमुख, दिलीप बाशिंगे, कुणाल महाराज आणि दिनेश बाशिंगे यांच्या उपस्थितीत कानबाई मातेच्या गाण्यांचा भव्य संगीतमय कार्यक्रम रंगला, ज्याने रसिकांची मने जिंकली. सोमवार २४ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ८ वाजता शुभम गार्डन ते जाधव घाट, रावेत या मार्गावर पारंपरिक वाद्यांच्या गजरात आणि शिरपूरच्या ‘गोल्डेन बँड’च्या प्रमुख उपस्थितीत विसर्जन मिरवणूक निघणार आहे. या महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी खान्देश मराठा मंडळ, मराठा पाटील समाज मंडळ, गुजर स्नेह वर्धिनी, केदारेश्वर प्रतिष्ठान, खानदेश तिळवण तेली समाज मंडळ, लेवा पाटीदार समाज मंडळ, खानदेश माळी महासंघ, संतसेना महाराज खान्देश नाभिक मंडळ, भारतीय बहुजन विकास समिती, खानदेश अहिराणी कस्तुरी मंच, आहिरे मराठा मंडळ, बारी समाज मंडळ, सोनार समाज मंडळ, धनगर समाज मंडळ, राजपूत समाज मंडळ, महाराणा मित्र मंडळ, कुंभार समाज मंडळ, बडगुजर समाज मंडळ, वंजारी समाज मंडळ, शिंपी समाज मंडळ, खानदेश लाड शाखीय वाणी समाज मंडळ, क्षत्रिय माळी समाज मंडळ, कासार समाज मंडळ, लोहार समाज मंडळ, अखिल टोकरे कोळी समाज मंडळ, सुतार समाज मंडळ आणि कानबाई सेवा फाउंडेशन (खानदेश) यांसह शहरातील सर्व समाजबांधव सहआयोजक म्हणून सक्रिय सहभाग घेत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### साठी ओलांडलेल्या बँकर्सचे गेटटुगेदर

**सासवड : दैनिक संध्या**

बँकिंग कार्यकाळातील वेगवेगळ्या अनुभवांचे कथन, गाणी, कविता वाचन, आपल्याच एका सहकाऱ्याचे अमृत महोत्सवी वाढदिवसाच्या निमित्ताने केलेले अभिष्टचिंतन, रेनडान्स व तलावात मनसोक्त डुंबण्याचा आनंद, साहशी खेळ खेळण्याची मजा, स्नेह भोजन अशा स्वरूपातील वयाची साठी ओलांडलेल्या सेवानिवृत्त बँकर्स मंडळींनी पुन्हा एकदा तरुणपणाची अनुभूती घेतली. बँक ऑफ इंडियाच्या सासवड व पिसर्वे या शाखेतील सेवानिवृत्त झालेल्या सुमारे सतरा जणांनी एकत्र येत हा अनुभव घेतला.यात चार महिला भगिनीही उत्स्फूर्त सहभागी झाल्या सासवड कोंढवा रस्त्यावरील माऊली रिसॉर्ट येथे हा गेट टुगेदर कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमात सर्व प्रथम बँकेतील दिवंगत सहकाऱ्यांचे स्मरण करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. काळुराम घारे यांचा यावेळी पंच्याहत्तरी निमित्त सत्कार व त्यांच्याविषयी सर्वांची मनोगते झाली. रिसॉर्टमध्ये असलेल्या विविध साहशी खेळांचा यावेळी भीती न बाळगता व वय विसरून सगळ्यांनी मनमुराद आनंद घेतला. बिपीन पाटील, उल्हास आढाव, मंजुश्री निरगुडे यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले तर हेमंत ताकवले यांनी सूत्रसंचालन केले. या गेट टुगेदरचे नियोजन करणारे रमेश कानडे यांनी सर्वांचे स्वागत केले. वंदे मातरम ने सोहळ्याची सांगता झाली  लता बालवे, सारंगी राऊत, संगीता थोरात, विलास मोकाशी, दत्तात्रय शेटे, प्रदीप जगताप, बंडु चोरघे, सुनील रासकर, लक्ष्मण सावंत, दिलीप गिते, संजय कांबळे अशी सगळी जेष्ठ मंडळी दैनंदिन व्याप विसरून स्वतःसाठी एक दिवस या आनंद सोहळ्यात सहभागी झाली. चार दोन महिन्यांनी असंच भेटण्याचा मनोदय या सगळ्यांनी व्यक्त करत निरोप घेतला.

### अखंड हरिनाम सप्ताह; हभप ज्ञानेश्वर महाराज दौंडकर यांची कीर्तनरूपी सेवा

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**

पूर्व हवेली तालुक्यातील बिवरी येथे श्रावण मासानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व श्री ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्याचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. सप्ताहादरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांसह ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज दौंडकर यांच्या कीर्तनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बोलताना ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज दौंडकर म्हणाले, “स्वतःचे नाव कमविण्यासाठी कष्ट करा; दुसऱ्याचे नाव खराब करून मोठे होण्यात ना सन्मान असतो, ना मोठेपणा.” संतांचा महिमा शब्दांत सांगणे कठीण असून, संतांचा सहवास, चांगले ज्ञान आणि उपदेश मिळाल्यानंतरही मनात परिवर्तनाची तयारी नसेल, तर त्याचा उपयोग होत नाही, असे त्यांनी सांगितले. माणसाचे आयुष्य शेवटाकडे आले तरी अनेकदा त्याला आपल्या चांगल्या-वाईट कर्मांचा विचार होत नाही. परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते; मात्र एखादी वस्तू खापराच्या तुकड्यासारखी झाली असेल, तर परिसाचा स्पर्श होऊनही तिचे सोने होत नाही. त्याचप्रमाणे मनात परिवर्तनाची इच्छा नसेल तर संतांचा सहवास आणि उपदेशही निष्फळ ठरतो, असे त्यांनी स्पष्ट केले. सप्ताहात दररोज पहाटे काकडा, सकाळी ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी प्रवचन, सायंकाळी हरिपाठ, तर रात्री कीर्तन व जागराचे आयोजन करण्यात आले. तसेच पालखी सोहळा व काल्याच्या महाप्रसादाने सप्ताहाची सांगता झाली. विविध मान्यवर प्रवचनकार व कीर्तनकारांनी आपल्या अमृतवाणीने भाविकांना मंत्रमुग्ध केले. या अखंड हरिनाम सप्ताहामुळे श्रद्धा, भक्ती, अध्यात्मिक परंपरा आणि सामाजिक सलोखा यांचा सुंदर संगम साधला गेला. समस्त बिवरी ग्रामस्थांनी सप्ताहाचे नियोजन व आयोजन अत्यंत उत्साहाने केले. यावेळी गायनाचार्य, मृदंगाचार्य, ग्रामस्थ, तरुण, महिला, ज्येष्ठ नागरिक, सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालक, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष तसेच आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रुग्णालयासमोरील अतिक्रमण हटविताना नगरपरिषद पथकावर हल्ला

**आळंदी : दैनिक संध्या**



ग्रामीण रुग्णालयासमोरील सार्वजनिक रस्त्यावरील अतिक्रमण हटविण्यासाठी गेलेल्या आळंदी नगरपरिषदेच्या अतिक्रमणविरोधी पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांवर अतिक्रमणधारकांनी हल्ला करून मारहाण केल्याची घटना गुरुवारी सायंकाळी सहाच्या सुमारास घडली. या घटनेत एक अधिकारी आणि दहा कर्मचारी अशा ११ जणांना मारहाण झाल्याची माहिती नगरपरिषद प्रशासनाने दिली. ग्रामीण रुग्णालयासमोरील सार्वजनिक रस्त्यावर काही विक्रेते अनधिकृतपणे व्यवसाय करीत असल्याने नागरिक, रुग्ण तसेच रुग्णवाहिकांच्या वाहतुकीस अडथळा निर्माण होत होता. याबाबत नगरपरिषदेकडून संबंधित विक्रेत्यांना यापूर्वी अनेकदा सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, सूचनांकडे दुर्लक्ष करून पुन्हा अतिक्रमण करण्यात आल्याने नगरपरिषदेचे पथक कारवाईसाठी गेले होते. कारवाईदरम्यान अतिक्रमणधारकांनी कर्मचाऱ्यांशी वाद घालत त्यांच्या अंगावर धावून जात मारहाण केली, असा आरोप नगरपरिषद प्रशासनाने केला आहे. मारहाणीनंतर पथकाने रस्त्यावर विक्रीसाठी ठेवलेले साहित्य जप्त केले असून, संबंधितांविरोधात पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. दरम्यान, यापूर्वीही अतिक्रमणामुळे रुग्णवाहिकेला रस्ता न मिळाल्याने उपचारास विलंब होऊन एका रुग्णाचा मृत्यू झाल्याची गंभीर घटना घडली होती. त्यामुळे रुग्णालयासमोरील सार्वजनिक रस्ता अतिक्रमणमुक्त ठेवणे आवश्यक असून, शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना संरक्षण मिळावे, अशी मागणी नगरपरिषद प्रशासनाने केली आहे.

### मार्चमधील अवकाळी पावसाच्या नुकसानीची भरपाई मिळण्यास सुरुवात

**पुरंदर : दैनिक संध्या**



पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील शेतकऱ्यांना मार्च २०२६ मध्ये झालेल्या गारपीट, अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यांमुळे झालेल्या पीक नुकसानीची भरपाई मिळण्यास सुरुवात झाली आहे. नुकसान भरपाईची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होण्यास सुरुवात झाल्याची माहिती पुरंदर पंचायत समितीचे सभापती अमित झेंडे यांनी दिली.मार्च महिन्यात कोथळे, पिंपरी, नायगाव, पिसर्वे, मावडी सुपे, पांडेश्वर, राजुरी, रिसे, पिसे, माळशिरस, जवळार्जुन आणि रानमळा या गावांमध्ये गारपीट, अवकाळी पाऊस व वादळी वाऱ्यामुळे बागायती पिके, फळबागा तसेच इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. हातातोंडाशी आलेली पिके नष्ट झाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले होते. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासनाकडून लवकरात लवकर मदत मिळावी, यासाठी सभापती अमित झेंडे यांनी संबंधित प्रशासन व शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला.

# विद्यार्थ्यांनी घेतला निवडणूक प्रक्रियेचा अनुभव

**■ नारायणगाव (दै. संध्या)**

जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा निमगाव सावा या ठिकाणी शालेय मंत्रिमंडळाची निवडणूक प्रक्रिया गुप्त मतदान पद्धतीने पार पडली.भारतीय लोकशाही व निवडणूक प्रक्रिया विद्यार्थ्यांना समजण्यासाठी विद्यार्थी निवडणूक घेण्यात आली. आजचे विद्यार्थी भावी मतदार असल्याने लोकशाहीचा महत्त्वाचा घटक मतदान ही प्रक्रिया कशी राबवली जाते, यासाठी हा उपक्रम राबवण्यात आला.अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक श्री ज्ञानेश्वर मोरे सर यांनी सांगितले. तिरंगा पॅनल व राजमुद्रा पॅनल या दोन पॅनलमधून विद्यार्थ्यांनी आपला प्रचार केला. दोन प्रचार फेऱ्या पूर्ण झाल्यानंतर उभे राहिलेल्या उमेदवारांचे मतदान करणाऱ्या विद्यार्थ्यांची संवाद साधने ही प्रक्रिया पूर्ण झाली. पूर्वी होत असलेले चिठ्ठीचे मतदान ही प्रक्रिया उत्तम होती. चिठ्ठीच्या मतदानामुळे निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांच्या मनामध्ये कोणतीही शंका राहत नाही. गुप्त मतदान प्रक्रियेचा वापर विद्यार्थ्यांनी केला. दुसरी, तिसरी आणि चौथीच्या विद्यार्थ्यांनी मतदान प्रक्रियेमध्ये भाग घेतला. निवडणुकीला उभे राहण्यासाठी आपण इतर विद्यार्थ्यांशी नेहमी चांगले वागले पाहिजे .हा प्रत्यय उभे राहिलेल्या उमेदवारांना आला.

श्रीमती शोभा गोंदके, श्री. बाळासाहेब राजगुरू,श्री.दत्तात्रय हडवळे, श्री. प्रभाकर गुंजाळ, श्री. संतोष वाघोले, श्रीमती पुष्पा साके, सौ. मंगल आग्रे या शिक्षकांनी निवडणुकीचा बूथ तयार केला. उमेदवारांच्या याद्या तयार केल्या. विद्यार्थी प्रतिनिधी घेऊन मतमोजणी करण्यात आली. मुख्याध्यापकांनी विजयी उमेदवारांचा निकाल घोषित केला.



विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष मतदान प्रक्रियेमध्ये सहभागी होऊन लोकशाहीचा आनंद लुटला अशा पद्धतीने एक छान निवडणूक प्रक्रिया पार पडली.

# चाकण बाजारात फळभाज्यांची प्रचंड आवक

**■ चाकण (दै. संध्या)**

खेड कृषी उत्पन्न बाजार समितीच्या चाकण येथील महात्मा फुले मार्केटयार्ड मध्ये कांदा, बटाटा, हिरवी मिरची व भेंडीची विक्रमी आवक झाली. चाकण मध्ये पालेभाज्यांचे भाव वधारले आहेत. दोडका, कारले व आले आदींची भरपूर आवक झाली. पालेभाज्यांच्या बाजारात कोथिंबीर, मेथी व पालक भाजीचे भाव तेजीत राहिले आहेत. एकूण उलाढाल ५ कोटी ५० लाख रुपये झाली.  चाकण येथील बाजारात कांद्याची एकूण आवक २ हजार १०० क्विंटल झाली. कांद्याला कमाल भाव १,५०० ते ४,००० रुपये मिळाला. बटाट्याची एकूण आवक १,७५० क्विंटल झाली. बटाट्याला कमाल भाव १,५०० रुपये मिळाला. लसणाची एकूण आवक ४५ क्विंटल झाली. लसणाचा कमाल भाव १६ हजार रुपयांवर स्थिरावला. हिरव्या मिरचीची एकूण आवक ४३५ क्विंटल झाली. हिरव्या मिरचीला १ हजार ५०० रुपयांपासून ते ४ हजार रुपयांपर्यंत भाव मिळाला. शेतीमालाची आवक व बाजारभाव पुढीलप्रमाणे : कांदा - एकूण आवक - २,१०० क्विंटल. भाव क्रमांक - १.४,००० रुपये, भाव क्रमांक २. ३,४०० रुपये, भाव क्रमांक ३. १,५०० रू. बटाटा - एकूण आवक - १,७५० क्विंटल. भाव क्रमांक १.१,५०० रुपये, भाव क्रमांक २.१,२०० रुपये, भाव क्रमांक ३.८०० रुपये.



फळभाज्या : फळभाज्यांच्या बाजारात एकूण आवक क्विंटलमध्ये व प्रतीदहा किलोंसाठी मालाला मिळालेले भाव कंसात पुढील प्रमाणे -

टोमॅटो - ३७५ क्विंटल (५०० ते १,५०० रू.), कोबी - २३० क्विंटल (८०० ते १,५०० रू.), फ्लॉवर - १६० क्विंटल (८०० ते ३,००० रु.), वांगी - ९६ क्विंटल (१,००० ते १,५०० रु.), भेंडी - ११४ क्विंटल (१,००० ते ३,००० रु.), दोडका - ६२ क्विंटल (१,५०० ते ४,००० रु.), कारली - ८५ क्विंटल ( २,००० ते ३,५०० रु.), दुधीभोपळा - ५० क्विंटल (८०० ते २,५०० रु.), काकडी - ९२ क्विंटल (८०० ते २,००० रु.), फरशी - २८ क्विंटल (३,००० ते ५,००० रु.), वालवड - ८४ क्विंटल (१,५०० ते ३,५०० रुपये), ढोबळी मिरची - १६८ क्विंटल (१,००० ते २,५०० रु.), चवळी - ५० क्विंटल (२,००० ते ४,००० रु.), शेवगा - ६७ क्विंटल (२,००० ते ५,००० रु.), गाजर - १६५ क्विंटल (१,५०० ते २,००० रु.), गवार - ४८ क्विंटल (२,००० ते ६,००० रु. ), आले - १८० क्विंटल (७०० ते १,२०० रु. )

## राष्ट्रीय रेडिओ दिनानिमित्त रोटरी क्लब ऑफ पुणे शिवाजीनगर तर्फे रेडिओ वाटप

**■ कोरेगावमुळ (दै. संध्या)**

राष्ट्रीय रेडिओ दिनाचे औचित्य साधून रोटरी क्लबच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळा, खुटबाव येथे विद्यार्थ्यांसाठी रेडिओचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना शैक्षणिक व ज्ञानवर्धक कार्यक्रम ऐकता यावेत, तसेच इंग्रजी भाषेचे श्रवण व आकलन कौशल्य विकसित व्हावे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. या रेडिओच्या माध्यमातून पुणे FM वरील ‘We Learn English’ हा शैक्षणिक कार्यक्रम विद्यार्थ्यांना नियमितपणे ऐकता येणार असून, त्यातून विद्यार्थ्यांना इंग्रजी ऐकण्याचा सराव व नवीन शब्दसंपत्ती आत्मसात करण्याची संधी मिळणार आहे. हे रेडीओ खुटबाव केंद्रातील १२ शाळांना वितरण केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संदीप गायकवाड यांनी केले. यावेळी रोटरी क्लब ऑफ पुणे शिवाजीनगर अध्यक्ष रोटरीयन प्रकाश गायकवाड, डायरेक्टर सर्विस प्रोजेक्ट रोटरियन अनिरुद्ध इनामदार, अध्यक्ष रोटरियन अनिल दामले, नितीन अभ्यंकर अध्यक्ष जागतिक रोटरी निधी यांच्या प्रयत्नातून तसेच शाळेचे मुख्याध्यापक निर्मला डोमाले, ज्योती सातव, सुदाम जाधव, प्रिती कामठे, अल्पना बनकर  यांनी नियोजन केले. खुटबाव केंद्राचे केंद्रप्रमुख संजय चव्हाण व सर्व



शाळेचे मुख्याध्यापक शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रियंका थोरात, जि.प सदस्य भाऊसाहेब ढमढेरे, भिमा पाटस कारखान्याचे संचालक संजय इनामके, गलांडवाडी शाळेचे मुख्यध्यापक तुकाराम शेलार, संजय तावरे, जिवन शिंदे, रामदास बारवकर, स्मिता गायकवाड, रोहिणी फणसे, गोवर्धन दराडे, मधुकर गिरमे नागेश निंबाळकर हे सर्व उपस्थित होते. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. रेडिओ भेट मिळाल्याबद्दल विद्यार्थ्यांनी आनंद व्यक्त केला. रोटरी क्लबच्या या शैक्षणिक उपक्रमाबद्दल शाळेच्या वतीने प्रदीप वाघोले यांच्या प्रयत्नामुळे केंद्रातील सर्व शाळांना रेडीओ मिळाले म्हणून मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन सुदाम जाधव यांनी केले. रोटरी क्लबच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना शिक्षणासोबतच माहिती, ज्ञान आणि इंग्रजी भाषेचा श्रवण सराव करण्यासाठी एक उपयुक्त माध्यम उपलब्ध झाले आहे.

## पिंपळवंडी घटनेची खासदार राजू शेट्टींकडून दखल; दोषींवर कारवाईची मागणी

**■ नारायणगाव (दै. संध्या)**

पिंपळवंडी येथे एका अल्पवयीन मुलीवर झालेल्या अत्याचार आणि हत्येच्या धक्कादायक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. या क्रूर आणि दुर्दैवी घटनेमुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, सर्वत्र भीतीचे वातावरण पसरले आहे.या अत्यंत संवेदनशील आणि गंभीर घटनेची दखल घेत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते आणि खासदार राजू शेट्टी यांनी थेट पिंपळवंडी गावाला भेट दिली. त्यांनी पीडित कुटुंबाच्या घरी जाऊन त्यांची भेट घेतली आणि त्यांचे सांत्वन केले.

भेट दरम्यान खासदार शेट्टी यांनी पीडित कुटुंबातील सदस्यांशी संवाद साधला आणि घडलेल्या संपूर्ण घटनेची सखोल माहिती जाणून घेतली. कुटुंबाचे दुःख समजून घेत त्यांनी त्यांना धीर दिला. या प्रकरणात कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असे सांगत त्यांनी संपूर्ण प्रकरणाचा निष्पक्ष आणि जलद गतीने तपास करण्याची मागणी प्रशासनाकडे



केली आहे. दोषींना कडक शिक्षा झालीच पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले. या अमानुष घटनेनंतर पिंपळवंडी आणि आसपासच्या परिसरातील महिला व मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. स्थानिक नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना कमालीची वाढली असून, आरोपींना लवकरात लवकर अटक करून त्यांना कठोर शिक्षा व्हावी, अशी आर्त मागणी जनतेकडून केली जात आहे. पीडित कुटुंबाला लवकरात लवकर न्याय मिळावा, यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी नागरिक करत आहे.

## नाट्यछटा स्पर्धेत सान्वी महाडीक व आद्या थोरात यांचे उल्लेखनीय यश

**■ बारामती (दै. संध्या)**

बालरंगभूमी परिषद, पुणे जिल्हा, उपशाखा पिंपरी-चिंचवड आयोजित कै. सौ. मनिषा भाऊसाहेब भोईर स्मृती नाट्यछटा स्पर्धेत न्यू बालविकास मंदिर, पिंपळी येथील विद्यार्थिनींनी उल्लेखनीय यश संपादन केले. इयत्ता आठवीतील सान्वी अमरेंद्र महाडिक हिने द्वितीय क्रमांक मिळविला, तर याच शाळेतील इयत्ता नववीतील आद्या अजय थोरात हिला उत्कृष्ट सादरीकरणाबद्दल सन्मानचिन्हे देऊन गौरविण्यात आले.

सान्वीने स्पर्धेसाठी ‘माझा डाएट उद्यापासून सुरू!’ हा विषय निवडला होता. विशेष म्हणजे या नाट्यछटेचे लेखन तिने स्वतः केले होते. स्वतः लिहिलेल्या नाट्यछटेचे प्रभावी सादरीकरण करून तिने अभिनयासोबतच आपली लेखनक्षमता, कल्पकता आणि सर्जनशीलतेचीही झलक दाखवून दिली. सान्वीच्या तयारीसाठी ज्योती दिसले मिस व अर्चना देव मिस यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच तिची आई प्रिया महाडिक यांनीही तिची विशेष तयारी करून घेतली. सान्वीच्या या यशाबद्दल शाळेच्या



मुख्याध्यापिका तनुश्री गोरे मॅडम यांनी तिचे विशेष कौतुक केले. तसेच विभागप्रमुख लीला शेट्टी मिस यांनीही तिच्या यशाचे अभिनंदन केले. याच स्पर्धेत आद्या अजय थोरात हिनेही उत्कृष्ट सादरीकरण करत विशेष पारितोषिक मिळविले. तिच्या प्रभावी अभिनयाची दखल घेत तिला सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

या दोन्ही विद्यार्थिनींची पुढील फेरीसाठी निवड झाली असून, बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी पुणे येथे पुढील फेरी पार पडणार आहे. या फेरीत सान्वी अमरेंद्र महाडिक आणि आद्या अजय थोरात या दोघीही आपल्या कलागुणांचे सादरीकरण करणार आहेत. एकाच शाळेतील दोन विद्यार्थिनींची पुढील फेरीसाठी निवड होणे ही न्यू बालविकास मंदिर, पिंपळी शाळेसाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या दोन्ही विद्यार्थिनींच्या यशामुळे शाळेचे नाव उंचावले असून, त्यांच्या यशाबद्दल पालक, विद्यार्थी, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी वर्गातून कौतुक व्यक्त होत आहे. दोन्ही विद्यार्थिनींना पुणे येथे होणाऱ्या पुढील फेरीसाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

# दत्तकला शिक्षण संस्थेची तीन विभागांकडून चौकशी

### रामदास झोळ व माया झोळ यांच्या अडचणी वाढल्या : रामदास झोळ अद्यापही फरार; अटकेसाठी विशेष पोलिस पथकांची नियुक्ती

**■ करमाळा (दै. संध्या)**

भोंदू मनोहर भोसले याच्याशी आर्थिक हितसंबंध असल्याच्या पोलिस तपासात निष्पन्न झाल्याने दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ आणि सचिव माया झोळ यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणात माया झोळ यांना पोलिसांनी अटक केली असून रामदास झोळ अद्यापही फरार आहेत. दत्तकला शिक्षण संस्थेबाबत धर्मादाय आयुक्त, शिक्षण विभाग आणि आयकर विभाग या तीनही यंत्रणांमार्फत चौकशी करण्याचे आदेश देण्यात आल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी दिली. त्यांच्या अटकेसाठी पोलिसांची विविध पथके तैनात करण्यात आली असून, विशेष पथकाचीही नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान रामदास झोळ याचा अटकपूर्व जामीन आज बार्शी न्यायालयाने फेटाळला आहे. मनोहर भोसले आणि दत्तकला शिक्षण संस्थेचे आर्थिक हितसंबंध असल्याचे



पोलिसांच्या तपासात निष्पन्न झाल्याचे यापूर्वीच पोलिसांनी सांगितले आहे. मनोहर भोसले याच्याकडून मिळालेल्या कथित पैशांची विल्हेवाट दत्तकला शिक्षण संस्थेच्या माध्यमातून लावल्याचे आणि तपासादरम्यान संस्थेच्या कामकाजातील विविध बाबींमध्ये अनियमितता आढळून आल्याचेही पोलिस तपासामध्ये निष्पन्न झाले  आहे. त्यामुळे धर्मादाय आयुक्त, शिक्षण विभाग आणि आयकर विभाग या तीनही स्तरांवरील चौकशीमुळे संस्थेच्या अडचणी वाढल्याचे दिसत आहे. मनोहर भोसले हा अनिष्ट प्रथा, महिलांवरील अत्याचार, बलात्कारासारखे गंभीर गुन्हे तसेच इतर विविध गुन्ह्यांप्रकरणी सध्या तुरुंगात आहे. त्याच्याशी संबंधित आर्थिक व्यवहारांच्या तपासातून दत्तकला शिक्षण संस्थेचा सहभाग निष्पन्न झाला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे. तपासादरम्यान दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ यांचा मनोहर भोसले याच्या कथित अवैध पैशांची विल्हेवाट लावण्यात सहभाग असल्याचे पोलिस तपासात निष्पन्न झाल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

या प्रकरणात मदत केल्याच्या आरोपावरून संस्थेतील राजेंद्र गोकुळ हुंबे याला ११ ऑगस्ट रोजी, तर लक्ष्मीकांत मन्मथ लिगाडे याला १३ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली होती. गुन्ह्याचा तपास सुरू असताना रामदास झोळ यांच्या पत्नी माया झोळ यांचाही या प्रकरणात सहभाग असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना १६ ऑगस्ट रोजी अटक करण्यात आली.

त्यानंतर तिन्ही आरोपींना माढा न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता, पोलिसांच्या कोठडीच्या मागणीनंतर न्यायालयाने त्यांना २१ ऑगस्टपर्यंत पोलिस कोठडी सुनावली होती. पोलिस कोठडीची मुदत संपल्यानंतर शुक्रवारी तिन्ही आरोपींना न्यायालयासमोर हजर करण्यात आले. यावेळी न्यायालयाने माया झोळ यांच्यासह राजेंद्र हुंबे आणि लक्ष्मीकांत लिगाडे या तिघांचीही १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. रामदास झोळ याचा अटकपूर्व जामीन आज बार्शी न्यायालयाने फेटाळला, त्यामुळे झोळ दाम्पत्य यांच्या अडचणी वाढल्या आहेत. दरम्यान या प्रकरणाचा पोलीस कसून तपास करीत आहेत. दबंग आय पी एस अधिकारी अंजना कृष्णा यांच्या अधिपत्याखाली एस आय टी स्थापन करण्यात आली आहे. कुठल्याही राजकीय दबावाला बळी न पडता रामदास झोळ यांचा भुरखा फाडल्यामुळे पोलिसांच्या कामगिरीचे सर्व सामान्य जनतेतून कौतुक होत आहे.




दैनिक
संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक

# सर्वोत्तम नागरिक सन्मान सोहळ्यात १८ मान्यवरांचा गौरव

■ मुंबई (दै. संध्या)

समाज आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करणे ही केवळ गौरवाची बाब नसून, त्यांच्या कार्यातून नव्या पिढीला प्रेरणा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य आहे, असे प्रतिपादन राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केले.

मेघाश्रेय फाउंडेशनतर्फे ॲस्टर बॉलरूम, द सेंट रेजिस हॉटेल, मुंबई येथे आयोजित 'सर्वोत्तम नागरिक सन्मान-२०२६' सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी माहिती तंत्रज्ञान आणि सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, रा.स्व. संघाचे अखिल भारतीय संघटन प्रभारी रामलाल यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. विज्ञान, संशोधन, संरक्षण, शिक्षण, आरोग्य, संगीत, कला-संस्कृती, चित्रपट, सामाजिक कार्य आणि अध्यात्म अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या १८ मान्यवरांचा यावेळी सन्मान करण्यात आला.

राज्यपाल म्हणाले की, आजच्या काळात आयटी व्यावसायिक, डॉक्टर, आर्किटेक्ट, कलाकार, उद्योजक आणि विविध क्षेत्रांत काम करणाऱ्या यशस्वी व्यक्तींचे एकत्र येणे ही विशेष बाब आहे. केवळ वैयक्तिक यश मिळवणे महत्त्वाचे नसून, ज्ञान, विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा उपयोग समाजाच्या विकासासाठी आणि प्रत्येकाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवण्यासाठी झाला पाहिजे.

भारतीय संस्कृतीत ज्ञान आणि विज्ञानाला विशेष महत्त्व आहे. शिस्त आणि स्वातंत्र्य यांचा सुंदर समन्वय भारतीय जीवनपद्धतीत दिसतो. शिस्त ही बंधन नसून स्वातंत्र्याकडे नेणारी शक्ती आहे. समाजात एकसारखेपणा अपेक्षित नसून विविधतेचा स्वीकार आणि परस्पर सन्मानातून समाज अधिक सक्षम होतो, असेही राज्यपालांनी नमूद केले.

आज सन्मानित झालेली प्रत्येक व्यक्ती समाजासाठी आदर्श आहे. त्यांच्या कार्याची ओळख अधिक व्यापक समाजापर्यंत पोहोचणे आणि युवा पिढीने त्यांच्याकडून प्रेरणा घेणे आवश्यक आहे. अशा उपक्रमांमुळे समाजातील सकारात्मक कार्याला प्रोत्साहन मिळते, असे राज्यपालांनी सांगितले.

मंत्री ॲड. शेलार म्हणाले की, जीवनाच्या प्रवासात अनेकदा दोन मार्ग आपल्यासमोर असतात. एक मार्ग आपल्याला लवकर यशाकडे घेऊन जातो, तर दुसरा मार्ग मनाला पटणारा असतो; मात्र त्यासाठी अधिक वेळ आणि संघर्ष करावा लागतो. मनापासून योग्य वाटणाऱ्या मार्गावर आत्मविश्वासाने चालणारेच खरे 'सर्वोत्तम नागरिक' ठरतात.

आज सन्मानित झालेल्या सर्व मान्यवरांनी आपल्या कार्यातून समाज आणि भारतीय संस्कृतीला समृद्ध करण्याचे काम केले आहे. कुणी सेवेतून, कुणी अभिनयातून, कुणी सामाजिक कार्यातून, तर कुणी आपल्या क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानातून समाजमूल्ये जपली आहेत. या सर्व मान्यवरांचे कार्य नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असून, त्यांच्या कार्यातून समाजाला सकारात्मक दिशा मिळते, असे मंत्री ॲड. शेलार यांनी सांगितले. रामलाल यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले.

मेघाश्रेय फाउंडेशनच्या संस्थापक सीमा सिंग यांनी प्रस्तावना केली. त्यांनी 'सर्वोत्तम नागरिक सन्मान' उपक्रमामागील भूमिका स्पष्ट करताना समाजासाठी निःस्वार्थपणे कार्य करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव आणि त्यांचा प्रेरणादायी प्रवास युवा पिढीसमोर आणण्याचा या उपक्रमाचा उद्देश असल्याचे सांगितले.

'सर्वोत्तम नागरिक सन्मान-२०२६' हा मेघाश्रेय फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेला उपक्रम असून, देशाच्या विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करून समाज व राष्ट्राच्या प्रगतीत मोलाचे योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा या माध्यमातून गौरव करण्यात येतो. या उपक्रमाचे यंदाचे तिसरे वर्ष आहे.

१. हरिहरन – भारतीय संगीत, पार्श्वगायन आणि गझल क्षेत्रातील उल्लेखनीय योगदान. २. प्रा. ज्येष्ठराज भालचंद्र जोशी – केमिकल इंजिनिअरिंग, संशोधन आणि वैज्ञानिक नेतृत्वातील उल्लेखनीय योगदान. ३. मानद कॅप्टन योगेंद्र सिंह यादव – कारगिल युद्धातील, विशेषतः टायगर हिल मोहिमेतील अतुलनीय शौर्य; परमवीर चक्र विजेते. ४. जया किशोरी – आध्यात्मिक विचार आणि प्रेरणादायी वक्तृत्वातून युवकांमध्ये जागृती निर्माण करण्यासाठी योगदान. ५. रवी किशन – खासदार, भोजपुरी व हिंदी चित्रपटसृष्टीतील योगदान तसेच तरुणांमधील लोकप्रियता; 'जेन झी ट्रेंडसेटर' म्हणून गौरव. ६. लक्ष्मी अग्रवाल – ॲसिड हल्ल्यातील पीडितांच्या हक्कांसाठी सामाजिक लढा आणि जनजागृती. ७. संजीव कपूर – भारतीय पाककलेचा देश-विदेशात प्रसार आणि लोकप्रियता वाढविण्यात योगदान. ८. अशोक लक्ष्मण सराफ – मराठी चित्रपट, नाटक आणि दूरचित्रवाणी क्षेत्रातील दीर्घ व उल्लेखनीय कारकीर्द; जीवनगौरव पुरस्काराने सन्मान. ९. डॉ. देवांश धनगर – संगणकशास्त्र आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील उल्लेखनीय कार्य. १०. सलीम मर्चंट – भारतीय चित्रपट संगीताला लोक, पारंपरिक आणि आधुनिक संगीताची जोड देणारे योगदान. ११. सुजय जयराज – शालेय शिक्षण, संस्था निर्मिती आणि शैक्षणिक नेतृत्वातील योगदान. १२. डॉ. जलील डी. पारकर – श्वसनविकार आणि फुफ्फुसविकाराच्या उपचार क्षेत्रातील दीर्घकालीन योगदान. १३. केदार जोशी – मराठी भाषेचा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रसार करण्यासाठी केलेले नाविन्यपूर्ण प्रयत्न. १४. सुभाष घई – हिंदी चित्रपटसृष्टीतील दिग्दर्शन, निर्मिती आणि चित्रपट शिक्षण तसेच भारतीय चित्रपटसृष्टीतील योगदान. १५. अभिमन्यू सिंह – विविध भारतीय भाषांतील चित्रपटांमध्ये प्रभावी आणि अष्टपैलू अभिनय. १६. अहमद खान – नृत्यदिग्दर्शनासह दिग्दर्शन, निर्मिती आणि लेखनातील बहुआयामी योगदान. १७. भूमी पेडणेकर – हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेत्री म्हणून उल्लेखनीय योगदान. १८. अभिषेक सिंह – हिंदी चित्रपटसृष्टीतील अभिनेता म्हणून योगदान. राज्यपाल वर्मा, मंत्री ॲड. शेलार आदींच्या हस्ते मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

'सर्वोत्तम नागरिक सन्मान'चा मुख्य उद्देश केवळ पुरस्कार देणे नसून, विविध क्षेत्रांतील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्वांचा जीवनप्रवास आणि कार्य युवा पिढीसमोर आणणे हा आहे. उत्कृष्टता, सामाजिक उत्तरदायित्व आणि राष्ट्रसेवेची भावना वाढीस लागावी, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.




# जलसमृद्ध, दुष्काळमुक्त महाराष्ट्राचा भक्कम पाया

**पाणी म्हणजे शेतीचा श्वास आणि विकासाचा आधार आहे. बदलते हवामान आणि घटती भूजल पातळी यामुळे जलसंधारणाचे महत्त्व अधिक अधोरेखित झाले आहे. पावसाच्या प्रत्येक थेंबाचे जतन करून तो जमिनीत मुरवणे, ही काळाची गरज आहे. जलसंधारणातून मातीला नवजीवन, शेतीला आधार आणि भावी पिढ्यांना सुरक्षित भविष्य देण्याची ताकद आहे.**

महाराष्ट्राचे एकूण भौगोलिक क्षेत्र ३०७.५८ लाख हेक्टर असून, त्यापैकी १७४.७३ लाख हेक्टर क्षेत्र शेतीखाली आहे. राज्यातील सुमारे ८२ टक्के शेती पावसावर अवलंबून असल्याने पावसाच्या पाण्याच्या प्रत्येक थेंबाचे संवर्धन करणे ही काळाची गरज बनली आहे. राज्यातील २४१ लाख हेक्टर क्षेत्र पाणलोट विकासासाठी पात्र असून, त्यापैकी १८२.४७ लाख हेक्टर क्षेत्रावर मृद व जलसंधारणाची विविध कामे पूर्ण झाली आहेत. उर्वरित क्षेत्रावरही नियोजनबद्ध पद्धतीने कामे सुरू आहेत.

महाराष्ट्र शासनाने जलसंधारणाला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून विविध प्रभावी योजना राबविल्या आहेत आणि राबवत आहे. राज्याला जलसुरक्षिततेच्या दिशेने सक्षमपणे पुढे नेण्यासाठी मृद व जलसंधारण विभाग सातत्याने कार्यरत असून जलस्रोतांचे संवर्धन, भूजल पुनर्भरण, विकेंद्रित जलसाठ्यांची निर्मिती आणि शाश्वत जलव्यवस्थापनाला प्राधान्य दिले जात आहे. जलयुक्त शिवार अभियानामुळे राज्यातील अनेक गावांमध्ये जलसाठे वाढले, विहिरींच्या पाणीपातळीत सुधारणा झाली आणि संरक्षित सिंचनाला चालना मिळाली. ज्या शेतकऱ्यांना पूर्वी वर्षातून एकच पीक घेता येत होते, अशा अनेक भागांत दुबार पिकांच्या संधी निर्माण झाल्या आहेत. जलसंधारणामुळे निर्माण होणारे संरक्षित सिंचन केवळ शेतीपुरते मर्यादित राहत नाही, तर ग्रामीण बाजारपेठ, रोजगार, दुग्धव्यवसाय आणि लघुउद्योगांनाही चालना देते.

जलयुक्त शिवार अभियानाच्या पहिल्या टप्प्यातील यशानंतर जलयुक्त शिवार अभियान २.० अंतर्गत राज्यातील ५,८५८ गावांमध्ये सुमारे १.४३ लाखांहून अधिक कामे प्रस्तावित झाली आहेत. त्यापैकी १.२४ लाखांपेक्षा अधिक कामे पूर्ण झाली आहेत. जुलै २०२६ अखेर या अभियानावर २,३०० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी खर्च करण्यात आला आहे. 'गाळमुक्त धरण आणि गाळयुक्त शिवार' ही योजना पर्यावरण आणि शेती यांचा सुंदर समन्वय साधणारी आहे. धरणातील गाळ काढल्यामुळे पाणीसाठवण क्षमता वाढते, तर तोच सुपीक गाळ शेतात टाकल्यामुळे जमिनीची गुणवत्ता आणि उत्पादन क्षमता सुधारण्यास मदत होते.

२०२३-२४ ते २०२५-२६ या कालावधीत राज्यातील ३,३०५ जलाशयांमधून ९८०.५० लक्ष घनमीटर गाळ काढण्यात आला असून, तो सुमारे १ लाख ९३ हजार एकर क्षेत्रावर पसरविण्यात आला आहे. यासाठी सुमारे ३४५ कोटी रुपये खर्च करण्यात आले असून, ८१,११४ स.घ.मी. पाणीसाठा पुनर्स्थापित झाला आहे. म्हणजेच जलसंधारण हे शेतीला केवळ पाणी देत नाही, तर जमिनीलाही नवजीवन देते.

भूजल पुनर्भरण हा जलसंधारणाचा अत्यंत महत्वाचा नैसर्गिक फायदा आहे. गेल्या काही दशकांत भूजलाचा मोठ्या प्रमाणावर उपसा झाल्यामुळे अनेक भागांत विहिरी कोरड्या पडणे, बोअरवेलची खोली वाढणे आणि उन्हाळ्यात पाण्याची उपलब्धता कमी होणे अशा समस्या निर्माण झाल्या आहेत. याचा शेतीसोबतच संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर दूरगामी परिणाम होतो. पावसाचे पाणी योग्य पद्धतीने अडवून जमिनीत मुरविले, तर भूजल पातळी सुधारण्यास मदत होते. ही प्रक्रिया केवळ शेतीसाठी नव्हे, तर पिण्याच्या पाण्याच्या दीर्घकालीन उपलब्धतेसाठीही अत्यंत महत्त्वाची आहे. भविष्यातील गंभीर पाणीटंचाईचे संकट टाळायचे असेल, तर भूजल संवर्धन आणि पुनर्भरणाला सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल. जलसंधारणाचा पर्यावरणावरही अत्यंत सकारात्मक परिणाम होतो. एखाद्या भागात पाणी टिकून राहिले, तर तेथील जैवविविधतेला आधार मिळतो. वृक्षसंवर्धनाला चालना मिळते, जमिनीतील ओलावा टिकतो आणि नैसर्गिक परिसंस्था मजबूत होण्यास मदत होते. अनेक ठिकाणी जलसंधारणाच्या कामांनंतर स्थानिक जैवविविधता आणि जलचरांसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाल्याची उदाहरणे दिसून येतात. त्यामुळे जलसंधारण ही केवळ विकासाची योजना नसून निसर्गाशी असलेले आपले नाते अधिक दृढ करण्याची प्रक्रिया आहे. आज हवामान बदल हे जगासमोरील सर्वात गंभीर आव्हानांपैकी एक आहे. पावसाचे स्वरूप बदलत आहे. काही दिवसांत अतिवृष्टी आणि त्यानंतर दीर्घ काळ पावसाचा खंड असे चित्र अनेक भागांत दिसून येते. अशा परिस्थितीत केवळ मोठी धरणे किंवा पारंपरिक सिंचन व्यवस्था पुरेशी ठरणार नाही. गाव पातळीवर पाणी अडवणे, पाणलोट विकास करणे, नैसर्गिक जलमार्ग जिवंत ठेवणे, पावसाचे पाणी जमिनीत मुरवणे आणि स्थानिक जलस्रोत मजबूत करणे हा शाश्वत मार्ग आहे. हवामान बदल आणि पर्जन्यमानातील अनिश्चिततेचा विचार करून मृद व जलसंधारण विभागाने जलयुक्त शिवार अभियान २.०, गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार आणि लघु सिंचन प्रकल्पांच्या कामांना गती दिली आहे. आवश्यक दुरुस्तीची कामे तातडीने पूर्ण करण्यावरही भर दिला जात आहे.

या सर्व उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाची महत्वपूर्ण भूमिका आहे. विभागाच्या नव्या प्रशासकीय आकृतिबंधाला मंजुरी मिळाल्यानंतर प्रकल्पांच्या अंमलबजावणीला अधिक गती मिळाली आहे. मंजूर कामे मूळ आराखड्यानुसार आणि निर्धारित कालमर्यादेत पूर्ण करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. गुणवत्तापूर्ण कामांसाठी स्वतंत्र मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आल्या असून, मालगुजारी तलावांच्या पुनरुज्जीवनासारख्या महत्त्वाच्या उपक्रमांनाही प्राधान्य दिले जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशांची प्रभावी अंमलबजावणी करून जलसंधारण अधिक परिणामकारक करण्यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. केंद्र आणि राज्य शासनाच्या संयुक्त प्रयत्नांतून प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना-पाणलोट विकास घटक २.० अंतर्गत राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये १४० प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

या माध्यमातून सुमारे ५.२५ लाख हेक्टर क्षेत्रावर जलसंधारण, भूजल पुनर्भरण, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन आणि शेतकऱ्यांच्या उपजीविकेला चालना देणारी विविध कामे सुरू आहेत. या योजनेचे एकूण प्रकल्पमूल्य १,२५१.११ कोटी रुपये असून, जुलै २०२६ अखेर सुमारे १,००३ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. मालगुजारी तलावांचे पुनरुज्जीवन, सिमेंट बंधारे, पाणलोट विकास, नाला खोलीकरण, भूजल पुनर्भरण आणि लोकसहभागातून राबविण्यात येणाऱ्या जलसंवर्धन उपक्रमांची प्रभावी सांगड घालत महाराष्ट्र जलसुरक्षिततेच्या दिशेने भक्कम वाटचाल करत आहे.

# महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची जनसंवाद कार्यक्रमास उपस्थिती



■ कोल्हापूर (दै. संध्या)

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी जनसंवाद कार्यक्रमाच्या जिल्हाधिकारी कार्यालयात नागरिकांच्या निवेदनांचा स्वीकार केला.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात सुमारे हजारांहून अधिक नागरिकांची निवेदने स्वीकारत संबंधितांना अश्वस्त केले. यावेळी आमदार सर्वश्री अमल महाडिक, अशोक माने, राहुल आवाडे, शिवाजी पाटील, महापौर रूपाराणी निकम, जिल्हाधिकारी डॉ .विजय राठोड, निवासी उपजिल्हाधिकारी गजानन गुरव, महसूल उपजिल्हाधिकारी संपत खिलारी, करवीर प्रांत अधिकारी मोसमी चौगुले, डॉ. समीर शिंगटे आदी उपस्थित होते .

# आरोग्य यंत्रणा सक्षम करण्यासह अत्याधुनिक सुविधा देण्यास कटिबद्ध

■ नाशिक (दै. संध्या)

ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिकांना उपचारासाठी दूरवर जावे लागू नये, यासाठी स्थानिक पातळीवरच सक्षम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने आरोग्य केंद्रामध्ये आवश्यक त्या सुविधा, मनुष्यबळ व वैद्यकीय साधनसामग्री उपलब्ध करून देण्यास कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

सार्वजनिक आरोग्य मंत्री श्री. आबिटकर यांनी ग्रामीण रुग्णालय सुरगाणा येथे भेट देत पाहणी केली. यावेळी ते बोलत होते. यावेळी आमदार नितीन पवार,आरोग्य उपसंचालक डॉ. कपिल आहेर, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सतीश शिंपी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुधाकर मोरे,निवासी वैद्यकीय अधिकारी संदीप सूर्यवंशी, डॉ. आनंद पवार,सुरगाणा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.संदीप चौधरी, वैद्यकीय अधिकारी डॉ .सचिन वानखेडे यांच्यासह संबंधित अधिकारी, परिचारिका, आरोग्य कर्मचारी उपस्थित होते. यावेळी मंत्री श्री. आबिटकर यांनी रुग्णालयातील रुग्णांशी संवाद साधत त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी केली.

मंत्री श्री. आबिटकर म्हणाले की, आरोग्य संस्थांमध्ये स्वच्छता, रुग्णसेवा, औषधांची उपलब्धता आणि वैद्यकीय उपकरणांची कार्यक्षमता याबाबत विशेष दक्षता घेण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. नागरिकांना शासनाच्या आरोग्य योजनांचा अधिकाधिक लाभ मिळवून देण्यासाठी आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी निर्देशित केले.

मंत्री श्री. आबिटकर यांनी सुरगाणा येथील ग्रामीण रुग्णालयांची पाहणी करताना बाह्यरुग्ण विभाग, आंतररुग्ण विभाग, प्रसूती विभाग, प्रयोगशाळा, औषध भांडार, रुग्ण कक्ष आदी सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केली. रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या नागरिकांना वेळेत व दर्जेदार आरोग्य सेवा मिळत आहेत का, याबाबत त्यांनी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली.

## थोडक्यात पण महत्वाचे

### पार्थिव शिवलिंग निर्मिती सोहळ्यास मुख्यमंत्री यांची भेट

नागपूर : मानकापूर येथील लोटस कल्चरल ॲण्ड स्पोर्टिंग असोसिएशनतर्फे शिवमंदिर परिसरात आयोजित पार्थिव शिवलिंग निर्मिती सोहळ्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेट दिली. मुख्यमंत्र्यांनीही या उपक्रमात सहभागी होत तीन शिवलिंगांची निर्मिती केली. मंत्रोच्चाराच्या जयघोषात मुख्यमंत्र्यांनी प्रथम शिवलिंगाचे दर्शन घेतले. या सोहळ्याचे संयोजक दयाशंकर तिवारी, अनिल बावनगडे, अमोल कोल्हे, आशिष पाली, नवीन जैन, प्रभाकर ठाकरे व समितीचे सदस्य उपस्थित होते. भारतीय संस्कृतीतील शिवआराधनेचे महत्त्व अधोरेखित करत मुख्यमंत्री म्हणाले, श्रावण महिन्यात आयोजित या सोहळ्यामुळे परिसरातील वातावरण पवित्र झाले असून येथे महिला पुरुषांसह दिव्यांगजन आणि बालकेदेखील पार्थिव शिवलिंगाची निर्मिती करीत असल्याचे दृश्य प्रसन्नता निर्माण करणारे आहे. भारतीय संस्कृतीत शिवआराधना महत्त्वाची मानली जाते. आदी-अनंताचे प्रतीक म्हणजे शिव. या शिवपूजेतून आत्मिक शांतता व मानसिक स्थैर्य प्राप्त होत आहे. यावर्षीच्या उपक्रमात ९१ लक्ष पार्थिव शिवलिंग निर्मिती करण्यात येणार असून महिनाभर चालणाऱ्या या सोहळ्यात सर्वांनी सहभागी व्हावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.

### विविध क्षेत्रांत सहभाग वाढविण्याला प्राधान्य

नागपूर : शिक्षण कौशल्य, क्रीडा स्टार्टअप आदी क्षेत्रात युवा पिढीचा सकारात्मक सहभाग आहे. त्यांचा हा सहभाग वाढविण्यासोबतच संपूर्ण मदत देण्यात येईल त्यासोबत स्टार्टअप इकोसिस्टीम मध्ये चर्चा करून चांगली पॉलिसी तयार करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यांनी आज दिली. रेशीमबाग मैदानावर मुख्यमंत्र्यांच्या प्रमुख उपस्थितीत 'मंथन फॉर युवा' या या उपक्रमांतर्गत ढोल ताशा पथकाचा जागतिक विक्रम तसेच विविध क्षेत्रातील आयकॉन असलेल्या व्यक्तींसोबत थेट संवाद, नशामुक्त महाराष्ट्र व देश यासाठी युवकांना शपथ आदी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी २५ हजार पेक्षा जास्त युवक व युवतींनी सहभाग नोंदवला. महाराष्ट्राची परंपरा असलेल्या ढोल ताशा पथकाने एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स, इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि वर्ल्ड रेकॉर्ड्स बुक ऑफ इंडियामध्ये जागतिक विक्रम नोंदविला आहे. आधार नोंद असलेल्या ५८५ ध्वजधारकांच्या या उपक्रमामुळे जागतिक विक्रमाची नोंद झाली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विश्वविक्रम केल्याबद्दल संपूर्ण चमूचे अभिनंदन केले. २५ हजारांपेक्षा जास्त युवकांच्या साक्षीने हा उपक्रम पूर्ण झाल्याचे सांगताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आजची युवा पिढी सर्वच क्षेत्रात आपल्या कौशल्याने नावलौकिक मिळवीत आहे. सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये सर्वाधिक सहभाग लाभलेल्या ध्वजधारकांच्या समावेशाबद्दल विश्वविक्रमामध्ये नोंद झाली असून यापूर्वी २६० ध्वज धारकांच्या समावेश असलेला विक्रम आज मोडीत निघाला आहे.

### मानवी मनातील कोलाहल सक्षमपणे उलघडणारी चित्रे

मुंबई : मानवी मनातील भावभावना, अंतर्मनातील गोंधळ आणि विचारांचा कोलाहल चित्रांच्या माध्यमातून प्रभावीपणे मांडणारे चित्रकार चंद्रगुप्त इंद्रजीत भालेराव यांच्या पहिल्या 'कोलाहल' या चित्रप्रदर्शनाला सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी भेट देऊन कलाकृतींची पाहणी केली. मुंबईतील जहांगीर आर्ट गॅलरी येथे आयोजित करण्यात आलेल्या या प्रदर्शनातील कलाकृती अत्यंत वेगळ्या धाटणीच्या असून, मानवी मनातील गुंतागुंत आणि अंतर्गत संघर्ष यांचा कलात्मक वेध घेणाऱ्या आहेत. प्रत्येक चित्राकडे पाहताना एक नवा विचार, नवी अनुभूती आणि कलेचा वेगळा पैलू उलगडत जातो, अशी भावना मंत्री ॲड. शेलार यांनी व्यक्त केली. या वेळी शेतकरी आणि ग्रामीण जीवनाचे वास्तव आपल्या कवितेतून अत्यंत नेमकेपणाने मांडणारे ख्यातकीर्त कवी इंद्रजीत भालेराव यांच्याशीही शेलार यांनी संवाद साधला. साहित्य आणि चित्रकलेच्या माध्यमातून समाजमनातील विविध पैलू अभिव्यक्त होत असल्याचे यावेळी चर्चेतून अधोरेखित झाले. 'कोलाहल' या प्रदर्शनाच्या माध्यमातून चंद्रगुप्त भालेराव यांनी चित्रकलेच्या क्षेत्रात स्वतंत्र आणि संवेदनशील वाटचालीची सुरुवात केली असून, त्यांच्या कलाकृती रसिकांना विचार करायला प्रवृत्त करणाऱ्या ठरत आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पीव्हीजी कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्समध्ये 'मेगा प्लेसमेंट ड्राइव्ह'ला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे विद्यार्थी गृहाचे (पीव्हीजी) कॉलेज ऑफ सायन्स अँड कॉमर्स आणि मॅजिक बस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'वॉक-इन मेगा प्लेसमेंट ड्राइव्ह २०२६'ला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या रोजगार मेळाव्यात सहभागी २४ कंपन्यांपैकी २१ कंपन्यांनी प्रत्यक्ष महाविद्यालयात, तर तीन कंपन्यांनी ऑनलाइन माध्यमातून निवड प्रक्रिया राबवली. महाविद्यालयातील जवळपास ३९० विद्यार्थ्यांनी या निवड प्रक्रियेमध्ये सहभाग नोंदवला. बँकिंग, वित्तीय सेवा, माहिती तंत्रज्ञान, आयटीईएस, बीपीओ, सायबर सुरक्षा, डिजिटल मार्केटिंग, अनिमेशन, एआय, मशीन लर्निंग, सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, वित्त व लेखा अशा विविध क्षेत्रांतील रोजगाराच्या संधी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिल्या. ॲक्सिस बँक, श्रीराम फायनान्स, लोकमान्य मल्टीपर्पज बँक, निनाद वेबटेक, एबी इन्फोटेक सोल्यूशन्स, डॉक्टर रेड्डीज फाऊंडेशन, कस्टर्ड ॲपल अनिमेशन, निनाद वेबटेक, सिद्धेश कम्युनिकेशन्स यांसह विविध नामांकित कंपन्यांचा समावेश होता. पुणे विद्यार्थी गृहाचे संचालक प्रा. डॉ. राजेंद्र कांबळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड, आयक्वॅकच्या समन्वयिका डॉ. स्वाती जोशी, अधिष्ठाता प्रा. महादेव पिसाळ, संगणकशास्त्र विभागप्रमुख प्रियांका खुटवड, वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. शीतल सुकटे, ॲनिमेशन विभागप्रमुख सिद्धांत खंडागळे, सायबर सुरक्षा विभागप्रमुख डॉ. शिवाजी गोडावळे, प्रशिक्षण व नियुक्ती अधिकारी प्रशांत देशमुख, मॅजिक बस फाउंडेशनच्या संपदा तिडके, नियुक्ती अधिकारी गिरीश कोरपे आणि किरण मोरे यांच्यासह विविध कंपन्यांचे संचालक, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मानव संसाधन विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते. प्राचार्य डॉ. संजयकुमार गायकवाड यांनी मेळाव्याचा आढावा घेतला. त्यात २५० उमेदवारांची द्वितीय फेरीसाठी निवड झाल्याचे आणि दोन उमेदवारांची ऑन द स्पॉट निवड झाल्याचे स्पष्ट झाले. तसेच भविष्यात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी अधिकाधिक रोजगार व प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी उद्योग-शैक्षणिक संस्थांमधील सहकार्य वाढविण्याबाबत चर्चा करण्यात आली. या संपूर्ण उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, प्रशिक्षण व नियुक्ती कक्षाचे सदस्य तसेच राष्ट्रीय सेवा योजना मधील विद्यार्थी स्वयंसेवकांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. सत्कार समारंभाचे सूत्रसंचालन प्रा. तेजल चोथे यांनी केले.



### 'फिट युवा, निरोगी भारत!'चा संदेश देत सी. टी. बोरा महाविद्यालयाची सायकल रॅली

**शिरूर, : दैनिक संध्या**

'फिट युवा, निरोगी भारत!' असा संदेश देत सी. टी. बोरा महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी रविवारी सायकल रॅलीद्वारे शिरूर ते अण्णापूर रोड असा प्रवास केला. फिट इंडिया मूव्हमेंट अंतर्गत 'संडेज ऑन सायकल – उन्नत भारत अभियान (UBA)' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. रॅलीला विद्यार्थी व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. निरोगी जीवनशैली, नियमित व्यायाम आणि सायकलिंगचे महत्त्व तरुणांपर्यंत पोहोचविणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. 'सायकल चालवा, आरोग्य जपा', 'फिट राहा, निरोगी राहा' तसेच 'फिट, हेल्दी व आत्मनिर्भर भारत' असा संदेश देत सहभागी सायकलस्वारांनी नागरिकांचे लक्ष वेधून घेतले. बदलत्या जीवनशैलीमुळे तरुणांमध्ये वाढत असलेली शारीरिक निष्क्रियता लक्षात घेता नियमित व्यायामाला दैनंदिन जीवनाचा भाग बनविण्याची गरज आहे. सायकलिंग हा आरोग्यदायी व्यायाम असून पर्यावरणपूरक वाहतुकीलाही त्यातून प्रोत्साहन मिळते. त्यामुळे आरोग्य आणि पर्यावरण संवर्धनाचा दुहेरी संदेश या रॅलीतून देण्यात आला. या रॅलीमध्ये विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व स्वयंसेवकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. सहभागींच्या उत्साहामुळे रॅलीच्या मार्गावर उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. या उपक्रमाचे नियोजन UBA समन्वयक डॉ. निलेश पाडळकर, जिमखाना समन्वयक डॉ. आप्पासाहेब चव्हाण, NSS कार्यक्रम अधिकारी प्रा. ओंकार दिंदळे, डॉ. सुरज सावंत, डॉ. सुनील भोईटे, प्रा. गणेश गव्हाणे, डॉ. सुभाष पांढरकर, डॉ. बिराप्पा बेळे व प्रा. तुषार डाळिंबकर यांनी केले. रॅलीच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के. सी. मोहिते, उपप्राचार्य प्रा. एच. एस. जाधव व जिमखाना विभाग प्रमुख डॉ. डी. एच. बोबडे यांचे मार्गदर्शन लाभले. "आरोग्यदायी युवा पिढी हीच विकसित भारताची ताकद आहे. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच शारीरिक तंदुरुस्ती आणि निरोगी जीवनशैलीलाही प्राधान्य द्यावे," असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.

### महिला वादकांच्या वादनातून वंदे मातरम् गीताला मानवंदना

**पुणे , : दैनिक संध्या**

देशभक्तीची ऊर्जा, ढोल-ताशांचा दणदणता निनाद आणि तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग यांचा संगम साधत पुण्यातील विविध ढोल-ताशा वाद्यपथकांमधील महिला वादकांनी वंदे मातरम् गीताला अनोख्या पद्धतीने मानवंदना अर्पण केली. वंदे मातरम् या गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमातून राष्ट्रभक्तीची भावना जागवत मातृभूमीला अभिवादन करण्यात आले. संस्कृती आणि देशप्रेमाचा वारसा पुढे नेणाऱ्या महिला वादकांच्या सामूहिक वादनाने देशभक्तीचा निनाद घुमला. ढोल ताशा महासंघ पुणे शहर आणि ढोल ताशा महासंघ महाराष्ट्र यांच्या वतीने या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ढोल-ताशा वाद्यपथकांमधील महिला वादकांनी एकत्र येत वादनातून वंदे मातरम् गीताला मानवंदना दिली. यावेळी मिलिंद सबनीस, मोनिका मोहोळ, उद्योजिका जान्हवी धारिवाल बालन, अभिनेत्री आदिती द्रविड, मंजिरी सावरकर, ढोल ताशा महासंघ महाराष्ट्राचे अध्यक्ष पराग ठाकूर, पुणे शहर अध्यक्ष अक्षय बलकवडे, कार्याध्यक्ष अभिजित कुमावत, उपाध्यक्ष अमर भालेराव, खजिनदार मंदार गोसावी, सचिव प्रशांत तांबे, संघटक ओंकार कलढोणकर, कुमार रेणुसे आदी उपस्थित होते. पुणे शहरातील विविध ढोल-ताशा पथकांमधील २०० पेक्षा अधिक महिला वादकांनी सहभागी होत सामूहिक वादनातून वंदे मातरम् गीताला मानवंदना अर्पण केली. मिलिंद सबनीस म्हणाले, वंदे मातरम् गीताला अशा पद्धतीने अभिवादन करणे हा वेगळा आणि सुंदर उपक्रम आहे. माते, तुला वंदन असो, असा या गीताचा भाव आहे. या एका गीताला बलिदानाचे अधिष्ठान लाभलेले आहे. त्यामुळे या गीताच्या शब्दांचे सामर्थ्य अधिक वाढले आहे.

# राजेंद्र पवार यांना राष्ट्रीय 'एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार प्रदान

■ **मुंबई (दै. संध्या)**

महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांच्या विद्युत क्षेत्रातील योगदानाबद्दल 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स' (भारत) संस्थेचा 'एमिनेंट इंजिनियर' हा राष्ट्रीय पुरस्कार अमरावती येथे शुक्रवारी (दि. २१) राज्याचे महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला.

'आयईआय'च्या ४१ व्या राष्ट्रीय विद्युत अभियंता अधिवेशनाचे अमरावती येथे शुक्रवारी (दि.२१) उद्घाटन झाले. या अधिवेशनात 'विकसित भारताचे ध्येय: एआय आणि हरित तंत्रज्ञानाद्वारे ऊर्जा क्षेत्राचा कायापालट' या विषयावर विचारमंथन झाले. सायंकाळच्या सत्रात 'आयईआय'च्या वतीने जाहीर झालेला 'एमिनेंट इंजिनियर' पुरस्कार महावितरणचे संचालक (मानव संसाधन) श्री. राजेंद्र पवार यांना महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार श्री. प्रवीण पोटे, आमदार श्री. प्रवीण तायडे, 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनियर्स'चे (भारत) अध्यक्ष श्री. मनिष कोठारी, पदाधिकारी श्री. आनंद जवंजाळ, श्री. राम विघे, श्री. आर. आर. तंवर, श्री. सुनील राठी आदींची उपस्थिती होती.

'अभियंता हे देशाच्या जडणघडणीचे शिल्पकार आणि मानवी प्रगतीचे शिलेदार आहेत. भारताच्या अभियंत्यांनी अफाट कौशल्याच्या जोरावर जगात अव्वल स्थान निर्माण केले आहे. जगातील सर्वोत्तम अभियंते भारतात आहेत. विद्युत क्षेत्रातील अभियंत्यांची अद्भूत कार्यक्षमता ऊर्जामंत्री म्हणून काम करताना मी जवळून अनुभवली आहे. एलिफंटा बेटासारख्या दुर्गम ठिकाणी समुद्रामधून भूमिगत वाहिनीद्वारे वीज पोहोचवण्याचे अशक्यप्राय आव्हान महावितरण व महापारेषणच्या अभियंत्यांनी लिलया पेलले. हा प्रकल्प म्हणजे भारतीय




अभियांत्रिकीच्या कौशल्याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे!' अशा शब्दांत महसूलमंत्री श्री. चंद्रशेखर बावनकुळे यांनी अभियंत्यांचा सन्मान केला. याआधीच्या सत्रात संचालक श्री. राजेंद्र पवार यांनी विकसित भारत २०४७ चे ऊर्जा उद्दिष्ट: आधुनिक ऊर्जा सुलभतेचा आराखडा आणि महाराष्ट्राची आघाडी' या विषयावर सादरीकरणाद्वारे माहिती दिली.

देशातील सर्वात मोठी व्यावसायिक संस्था असलेल्या 'द इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स इंडिया'ची स्थापना १९२० मध्ये झाली आहे. कोलकाता मुख्यालय असलेल्या या संस्थेचे देशभरात १२५ पेक्षा अधिक स्थानिक केंद्र आहेत.

# औद्योगिक क्षेत्राच्या कायापालटासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा रोडमॅप

■ **पुणे, (दै. संध्या)**

चाकण-तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील उद्योजकांच्या अडीअडचणी दूर करण्यासाठी आणि येथील उद्योगांचे स्थलांतर रोखण्यासाठी शासन पूर्णपणे सकारात्मक आहे. उद्योजकांना पुरेशा पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासोबतच परिसरातील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी तातडीची आणि दीर्घकालीन पावले उचलली जात असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.



उपमुख्यमंत्र्यांनी आज तळेगाव, चाकण येथे भेट देवून रस्त्यांची दुरुस्ती कामाची पाहणी तसेच उद्योजकांच्या प्रतिनिधींसमवेत बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी उद्योगमंत्री उदय सामंत, विधान परिषद सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे, आमदार शरद सोनवणे, आमदार बाबाजी काळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्यासह चाकण व तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील उद्योजक, औद्योगिक संघटनांचे प्रतिनिधी आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूक कोंडी होणाऱ्या विविध ठिकाणांची प्रत्यक्ष पाहणी करून सद्यस्थितीची माहिती घेतली. यादरम्यान त्यांनी एम-६० हार्डनरचा वापर करून खड्डे बुजवण्याचे काम आणि पावसाने खराब झालेल्या रस्त्यांवर थेट कास्टिंग केलेले पॅचेस बसवण्याच्या कामाची पाहणी केली. या नवीन तंत्रज्ञानामुळे कमी वेळात रस्ता पूर्ववत करून त्यावरून अवजड वाहने सोडणे शक्य होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

चाकण-शिक्रापूर मार्गावर मोठ्या प्रमाणात पडलेल्या खड्ड्यांमुळे वाहतूक कोंडीचा मोठा फटका उद्योजकांना बसत आहे. पावसाळ्यात पारंपरिक डांबरीकरण टिकत नसल्याने यावर मात करण्यासाठी जिओ पॉलिमर टेक्नो पॅच आणि एम-६ आरएमसी विथ हार्डनरचा वापर केला जात आहे. जिओ पॉलिमर मिश्रणाला अर्धा ते पाऊण तासातच सेट होत असल्याने खड्डे भरल्यानंतर तातडीने वाहतूक सुरू करणे शक्य होत आहे. तसेच सर्वाधिक खराब झालेल्या ठिकाणी प्री-कास्ट पॅनेल ट्रेलरद्वारे आणून थेट बसवण्यात येत आहेत.

औद्योगिक क्षेत्रातील समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली विशेष नोडल समिती स्थापन करण्यात आली असून, या समितीची बैठक आता दर शुक्रवारी होणार आहे.

रस्ते, ड्रेनेज, फुटपाथ आणि स्ट्रीट लाईट्ससह पायाभूत सुविधांच्या विकासावर या समितीमार्फत भर दिला जाईल. तसेच चाकणमध्ये येणाऱ्या वाहनांची ये-जा सुलभ व्हावी यासाठी तळेगाव ते शिक्रापूर या ५४ किलोमीटर मार्गाची दुरुस्ती, नाशिक फाटा ते राजगुरुनगर रस्ता आणि अंतर्गत रस्ते बांधणीला गती दिली जाणार असून रस्ते बांधताना फुटपाथ, युटिलिटी आणि सायकल ट्रॅकचा समावेश करण्याचे निर्देश देण्यात आल्याचे उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी सांगितले. कामगारांच्या प्रवासाचा वेळ वाचावा यासाठी औद्योगिक क्षेत्रात क्लस्टरच्या माध्यमातून कामगार वसाहती (टाउनशिप) उभारण्याबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. तसेच निगडी ते चाकण, चाकण ते राजगुरुनगर आणि तळेगाव ते शिक्रापूर या मेट्रो मार्गांचा विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश महामेट्रो प्राधिकरणाला देण्यात आले आहेत. उद्योजकांच्या समस्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी एमआयडीसीचे कार्यकारी अभियंते व इतर अधिकारी आठवड्यातून एक दिवस प्रत्यक्ष उपलब्ध राहतील. तसेच उद्योजकांनी आपल्या समस्या मांडण्यासाठी 'मैत्री' ॲपचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन करण्यात आले. वीज ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढवून लोडशेडिंगचे नियोजन करणे, स्वतंत्र एजन्सीमार्फत कचऱ्याची विल्हेवाट लावणे तसेच पाणीपुरवठा व पोलीस प्रशासनाशी संबंधित प्रश्न तातडीने सोडवण्याबाबतही बैठकीत निर्णय घेण्यात आले. शासनाच्या या सर्व उपाययोजनांमुळे उद्योजकांच्या समस्यांचे निवारण होऊन त्यांचे समाधान झाले असून, उद्योजकांनी आपले उद्योग बाहेर नेण्याबाबतचे मतपरिवर्तन झाल्याचे यावेळी स्पष्ट केले.

# वीज क्षेत्रातील सुरक्षिततेसाठी 'सीईए' नियमांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक

■ **पुणे (दै. संध्या)**

देशातील वीज व्यवस्थेची सुरक्षितता, विश्वासार्हता आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी केंद्रीय विद्युत प्राधिकरणाच्या नियम व तांत्रिक मानकांची प्रभावी अंमलबजावणी करणे अत्यावश्यक असल्याचे मत वीज क्षेत्रातील मान्यवरांनी व्यक्त केले.

केंद्रीय विद्युत प्राधिकरण, भारत सरकारच्या ऊर्जा मंत्रालय आणि महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित (महापारेषण) यांच्या संयुक्त विद्यमाने पुण्यात केंद्रीय विद्युत प्राधिकरण नियम व तांत्रिक मानकांवरील प्रादेशिक स्तरावरील एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेत पश्चिम विभागातील विविध राज्यांतील वीज कंपन्या, सार्वजनिक व खासगी क्षेत्रातील वीज उपक्रम, तज्ज्ञ आणि अधिकारी अशा सुमारे दीडशे प्रतिनिधींनी सहभाग घेतला.

कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे सदस्य (थर्मल), सदस्य (ई अँड सी) व भारत सरकारचे पदसिद्ध अतिरिक्त सचिव श्री. प्रवीण गुप्ता हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण आणि संचालक (प्रकल्प) श्री. दत्तात्रय पडळकर हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच केंद्रीय विद्युत प्राधिकरणाचे मुख्य अभियंता (नियामक व्यवहार) श्री. एल. के. एस. राठोड, एनपीसीच्या सदस्य सचिव श्रीमती ऋषिका शरण, महापारेषणचे कार्यकारी संचालक श्री. शशांक जेवळीकर, श्री. पीयूष शर्मा यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

श्री. प्रवीण गुप्ता यांनी केंद्रीय विद्युत प्राधिकरण नियमांचा मुख्य उद्देश भारतीय वीज ग्रिडची सुरक्षितता, विश्वासार्हता आणि कार्यक्षमता सुनिश्चित करणे हा असल्याचे सांगितले. या कार्यशाळेचा उपयोग वीज क्षेत्रातील अधिकारी व अभियंत्यांनी नियमांची सखोल माहिती करून घेण्यासाठी करावा, असे आवाहन त्यांनी केले.

महापारेषणचे संचालक (संचलन) श्री. सतीश चव्हाण यांनी महापारेषणच्या पारेषण व्यवस्थेची माहिती देताना नवीकरणीय ऊर्जा ग्रिडमध्ये समाविष्ट करण्यासाठी पारेषण जाळ्याचा सातत्याने विकास करण्यात येत असल्याचे सांगितले. संचालक (प्रकल्प) श्री. दत्तात्रय पडळकर यांनी महाराष्ट्रातील सुरू असलेल्या पारेषण प्रकल्पांची माहिती देत, प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी आणि ग्रिडचे सुरळीत संचलन यासाठी केंद्रीय विद्युत प्राधिकरण नियमांचे महत्त्व अधोरेखित केले.




# माणुसकी व कृतज्ञ भावनेतून साधलेली प्रगती समाजहिताची

■ **पुणे (दै. संध्या)**

सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्याची आणिपुणे: "शिक्षणाचे व्यापारीकरण होत असताना माणुसकीच्या भावनेतून गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्यासाठी शेकडो दाते पुढे येत आहेत. त्यांच्या विश्वासाला सार्थ ठरत विद्यार्थ्यांनी प्रगतीच्या मार्गावर चालताना कृतज्ञ भावनेतून पुन्हा या कार्यात जोडून घेतले, ही सकारात्मक गोष्ट आहे. माणुसकी आणि कृतज्ञता याची सांगड घालणारा दिशा परिवाराचा हा उपक्रम स्तुत्य आहे," असे प्रतिपादन राष्ट्रीय शिक्षक पुरस्काराने सन्मानित दत्तात्रय वारे गुरुजी यांनी केले. महाराष्ट्रातील प्रत्येक सरकारी शाळेला गुणवत्तापूर्ण आणि जागतिक दर्जाचे शिक्षण देणारी संस्था बनविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज आहे, असे परखड मत त्यांनी मांडले.




दिशा परिवार चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने आयोजित २० व्या शैक्षणिक शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यात दत्तात्रय वारे गुरुजी बोलत होते. नवी पेठेतील एस. एम. जोशी सभागृहात झालेल्या सोहळ्यात २५० गरजू विद्यार्थ्यांना देणगीदारांच्याच हस्ते शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली. मराठवाडा मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. भाऊसाहेब जाधव समारंभाच्या अध्यक्षस्थानी होते. प्रसंगी एबीपी माझाचे मुख्य संपादक राजीव खांडेकर, उद्योजक गणेश जाधव, दैनिक प्रभातचे सरव्यवस्थापक रवीकुमार इंडी, माजी सरव्यवस्थापक बी. एल. स्वामी, दिशा परिवाराचे संस्थापक राजाभाऊ चव्हाण, शिष्यवृत्ती प्रदान समारंभ समितीचे अध्यक्ष सुजीत शिंदे, संस्थेचे अध्यक्ष मकरंद कुलकर्णी, कार्याध्यक्ष अरुण कुलकर्णी, विश्वस्त विवेक अगरवाल, सचिव निखिल पडवळ, चिन्मय कुलकर्णी यांच्यासह अन्य पदाधिकारी, विद्यार्थी, देणगीदार उपस्थित होते. दत्तात्रय वारे गुरुजी म्हणाले, "शिक्षणाच्या व्यापारीकरणाला आळा घालण्यासाठी सरकारी शाळा सक्षम व्हायला हव्यात. यासाठी आम्ही काम करीत आहोत. मुलांची शैक्षणिक प्रगती होत नसेल, तर त्याची शंभर टक्के जबाबदारी शिक्षकांनी स्वीकारली पाहिजे. समर्पित शिक्षक, पालक आणि लोकसहभाग यांच्या बळावर सरकारी शाळांमध्ये मोठा बदल घडवून आणता येतो. समर्पित शिक्षक आणि लोकसहभागाच्या जोरावर महाराष्ट्रातील प्रत्येक सरकारी शाळेला जागतिक दर्जा मिळवून देण्याचा प्रयत्न व्हायला हवा."

खांडेकर म्हणाले, "शिक्षणाच्या बळावर प्रगती करताना ज्यांच्या पाठिंब्यामुळे आणि कष्टांमुळे आपण घडलो, त्यांच्या विश्वासाला सार्थ ठरवत एक संवेदनशील माणूस म्हणून समाजाचे देणे फेडणे, हाच खऱ्या अर्थाने यशाचा आणि प्रगतीचा मार्ग आहे. दिशा परिवारासारख्या संस्थांच्या साथीने अडचणींवर मात करून यशाची शिखरे गाठताना समाज आणि देशाप्रती असलेल्या कर्तव्यांचा विसर पडू देऊ नये. आजूबाजूला नकारात्मकतेचे सावट असतानाही दिशासारख्या संस्था समाजात आशेचे किरण पेरण्याचे मोलाचे काम करत आहेत."

भाऊसाहेब जाधव म्हणाले, "दिशा परिवाराने शेकडो माणसे जोडत हजारो विद्यार्थ्यांच्या पाठीशी उभे राहण्याचे काम केले आहे. या मदतीच्या पाठिंब्याने उभारलेले अनेक विद्यार्थी आज कृतज्ञ भावनेतून या कामात जोडले जात आहेत. दिशा परिवारात दाते व मदत घेणारे गरजू विद्यार्थी हे सर्व जाती-धर्माचे आहेत. त्यामुळे इथे केवळ शिष्यवृत्तीच दिली जात नाही, तर समाजाला एकसंध ठेवण्याची भावना रुजवली जाते." दिशा परिवाराच्या कार्याविषयी सांगताना राजभाऊ चव्हाण म्हणाले की, गोरगरीब विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याचा हा उपक्रम २० वर्षे चालू आहे, याचा आनंद वाटतो. 'आम्ही फक्त दोन हातातील अंतर कमी करतो' या ब्रीदवाक्यावर दाते आणि गरजू विद्यार्थ्यांना एकत्रित करण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून करता येतेय, याचे समाधान वाटत असल्याचे चव्हाण यांनी नमूद केले.

'बीएएमएस'च्या द्वितीय वर्षात शिकणारी साताऱ्याची पूजा बोरकर हिने दिशा परिवाराकडून मिळालेली शिष्यवृत्ती आणि वसतिगृहात राहण्याची झालेली सोय यामुळेच मला शिकण्याची संधी मिळाल्याची कृतज्ञ भावना व्यक्त केली. अनिरुद्ध करंदीकर यांनी विद्यार्थ्यांना एआय (कृत्रिम बुद्धिमत्ता) व तंत्रज्ञानाच्या युगात मोफत मार्गदर्शनाची तयारी दर्शवली. आरती भोसले यांनी दिशा केवळ आर्थिक मदत न देता देणगीदार आणि विद्यार्थी यांच्यात आपुलकीचे नाते निर्माण करते, असे सांगत कौतुक केले.